इचलकरंजी R.N.I. Regi. No. 63119/94 ■ पोस्टल रजि.नं. KLR/78/2024-2026 ■ अंक -१७२ ■ वर्ष - ४२

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर - सांगली - सातारा - बेळगांव

■ शुक्रवार,ता. २३ ऑक्टोबर २०२६ ■ अश्विन शु. १२ ■ पाने १२+४=१६ ■ किंमत ५ रूपये

■ www.emahasatta.com ■ mahasatta@gmail.com

## पुणे विभागीय पदवीधर, शिक्षक मतदार संघासाठी आज मतदान

**कोल्हापूर, ता.२२ (प्रतिनिधी)–**

विधान परिषदेच्या पुणे विभाग शिक्षक मतदारसंघाच्या आणि पुणे विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. पदवीधर निवडणुकीत ४७ उमेदवार आणि शिक्षक मतदार संघासाठी ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. दोन्ही मतदारसंघात मिळून विभागातील पाच जिल्ह्यांत १ हजार ५१ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली

(सविस्तर वृत्त पान २ वर)












# पदवीधर व शिक्षक मतदारसंघासाठी आज मतदान

## यंत्रणा सज्ज ; १०५१ मतदान केंद्रावर ४ लाख ४९ हजार ९५९ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

■ कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभागीय पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीसाठी आज शुक्रवारी मतदान होत असून निवडणूक प्रक्रिया नि:पक्ष, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणुक यंत्रणा सज्ज आहे.**

पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीत ४७ उमेदवार आणि शिक्षक मतदार संघासाठी ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी दोन्ही मतदारसंघात मिळून विभागातील पाच जिल्ह्यांत १ हजार ५१ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून ४ लाख ४९ हजार ९५९ मतदार आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावणार आहेत.

पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण मतदार संख्या ३ लाख ८८ हजार १९ असून मतदान केंद्रे ७४१ आहेत. जिल्हानिहाय मतदान केंद्रे व मतदारांची संख्या (कंसात) अनुक्रमे पुढील प्रमाणे आहे. पुणे १६० मतदान केंद्रे (८८ हजार २०२ मतदार), सातारा- ९३ (४७ हजार ४६३), सोलापूर ११७ (४९ हजार ७२, सांगली- १५९ (८८ हजार ७०) आणि कोल्हापूर जिल्ह्यात २१२ मतदान केंद्रे १ लाख १४ हजार ५६२ मतदारांची संख्या आहे. तर शिक्षक मतदारसंघ निवडणुकीसाठी एकुण मतदान केंद्रे ३१० असून मतदार संख्या ६१ हजार ९४० आहे. जिल्हानिहाय मतदान केंद्रे व मतदारांची संख्या (कंसात) अनुक्रमे पुढील प्रमाणे आहे. पुणे ७२ मतदान केंद्रे (१६ हजार ८२२ मतदार), सोलापूर ७६ (१५ हजार ३०३), सातारा- ४४ (९ हजार ४५४), सांगली- ४८ (८ हजार ६२) आणि कोल्हापूर जिल्ह्यात ७० मतदान केंद्रे व १२ हजार २९९ मतदारांची संख्या आहे.

शिक्षक व पदवीधर मतदार संघांसाठी एका मतदान केंद्रावर एक केंद्राध्यक्ष, तीन मतदान अधिकारी आणि एक शिपाई याप्रमाणे ५ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राखीव कर्मचाऱ्यांसह सुमारे ७ हजार ५०० मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. मतदान केंद्रावर रँप, पिण्याचे पाणी, वीज व प्रकाशयोजना, स्त्री-पुरुषासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, सावली, वैद्यकीय किट, मदत कक्ष, स्वयंसेवक, दिशादर्शक फलक व रांग व्यवस्थापनाची सोय करण्यात आली आहे. तसेच मतदार मदत केंद्राची सुविधाही उपलब्ध करुन देण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया नि:पक्ष, पारदर्शक व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी पाचही जिल्ह्यांत नोडल अधिकारी म्हणून निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून एकूण ३० भरारी पथके (एफएसटी) नियुक्त करण्यात आली आहेत. तसेच विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे २४ तास कार्यरत तक्रार निवारण नियंत्रण कक्ष सुरू आहे. प्रत्येक तक्रारीची नोंद वेळ व कारवाईसह ठेवली जात असून तक्रारींचे तत्काळ सनियंत्रण होत आहे. मतदानानंतर मतमोजणी मंगळवार दि. २७ ऑक्टोबर रोजी श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथील बॅडमिंटन हॉलमध्ये होणार आहे. यामध्ये शिक्षक मतदार संघाच्या मतमोजणीसाठी तीन रांगांमध्ये ४२ टेबल तर प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, दोन मतमोजणी सहायक व एक शिपाई. तर पदवीधर मतदार संघाच्या मतमोजणीसाठी पाच रांगांमध्ये १०० टेबल आणि प्रत्येक टेबलवर एक मतमोजणी पर्यवेक्षक, दोन मतमोजणी सहायक व एका शिपायाची नियुक्ती करण्यात आली आहे. पाचही जिल्ह्यातील

सर्व मतदारांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त पुणे, शीतल तेली-उगले यांनी केले आहे.

# डेटा चोरून कंपनीची फसवणूक ; चौघांवर गुन्हा

■ इचलकरंजी,ता.२२–

**येथील न्यू इंडस्ट्रीयल इस्टेटमधील परिसरातील टेक्सहब इनोव्हेशन्स प्रा. लि. या कंपनीतील गोपनीय डेटा चोरून त्याचा स्वत:च्या फायद्यासाठी कंपनीची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी कंपनीतील चार उच्चशिक्षित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी कंपनीचे मालक मनिषकुमार बालकृष्ण पोरवाल (रा. ईस्ट मँचेस्टर होम्स) यांनी शिवाजीनगर पोलिसांत तक्रार दिली आहे.**

पोरवाल यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मालकीची टेक्सहब इनोव्हेशन्स प्रा. लि. यासह कापड व्यवसायाच्या विविध कंपन्या आहेत. टेक्सहब इनोव्हेशन या कंपनीत ताहीर जाकीर मुजावर, सम्मेद राजकुमार बेडक्याळे, स्वप्नील सूर्यकांत कडोलकर आणि प्रवीण अल्लाप्पा चौगला हे चौघेजण कामाला आहेत. या चौघा कर्मचाऱ्यांनी संगनमत करून कट रचला. त्यांनी कंपनीने दिलेले मोबाईल व त्यामधील सीमचा वापर करत कंपनीकडील ग्राहकांची यादी (कस्टमर डेटा), डिझाईन फोटो, डिझाईन पेपर, इनव्हॉईस कॉपी व गोपनीय माहिती स्वतःच्या वैयक्तिक मोबाईलवर ट्रान्सफर करून समांतर कापड व्यवसाय सुरू केला. याद्वारे त्यांनी संगनमताने माहितीचा गैरवापर करून ताहीर मुजावर याचे वडील जाकीर मुजावर यांच्या नावावर असलेल्या डुओटेक्स व्हेवज् या कंपनीला ऑर्डर्स मिळवून दिल्या. त्यांनी स्वतःच्या फायद्यासाठी मूळ कंपनीचा डाटा चोरुन कंपनीचे मोठे आर्थिक नुकसान केले. २२ सप्टेंबर २०२६ रोजी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोरवाल यांनी चौघांच्या विरोधात पोलिसांत तक्रार दिली आहे.

# गोकुळ अध्यक्षपदाची निवड; कोरम पूर्ण करण्याचे आव्हान

■कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत २५ पैकी १३ जागा जिंकून काँग्रेस समविचारी आघाडीने सत्ता मिळवली असली, तरी अध्यक्ष निवडीच्या सभेत कोरम पूर्ण करण्यासाठी एका संचालकाची साथ आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे महायुतीतील एका संचालकाची भूमिका निर्णायक ठरू शकते. अध्यक्षपदाची निवड गुरुवारी, २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता गोकुळ शिरगाव येथील संघाच्या मुख्य प्रकल्पस्थळी होणार आहे.**

आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस समविचारी आघाडीने निवडणुकीत १३ जागा जिंकल्या, तर भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिंदेसेना आणि जनसुराज्य पक्षाच्या महायुतीला १२ जागा मिळाल्या. संख्याबळानुसार समविचारी आघाडीचे पारडे जड असले, तरी अध्यक्ष निवडीसाठी आवश्यक कोरमचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. गोकुळच्या संचालक मंडळात एकूण २५ सदस्य आहेत. अध्यक्ष निवडीच्या सभेसाठी किमान १४ संचालकांची उपस्थिती आवश्यक असल्याचे सांगितले जात आहे. समविचारी आघाडीकडे १३ संचालक असल्याने कोरम पूर्ण करण्यासाठी आणखी एका संचालकाची उपस्थिती आवश्यक आहे. महायुतीचे संचालक सभेला उपस्थित राहिले नाहीत, तर निवड प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊ शकतो.



**२९ ऑक्टोबरला सभा ; दोन्ही आघाड्यांकडून तयारी**

**कोरमअभावी सभा तहकूब झाल्यास काय ?**

अध्यक्ष निवडीच्या पहिल्या सभेत कोरम पूर्ण न झाल्यास पुढील कार्यवाही काय असेल, याबाबत दोन्ही आघाड्यांकडून पोटनियमांची माहिती घेतली जात आहे. सलग तीन सभा तहकूब झाल्यास प्रशासकीय हस्तक्षेपाची शक्यता असल्याची चर्चा असून, यासंदर्भातील नियमांची खातरजमा केली जात आहे. निवडणुकीत मिळालेल्या बहुमतानंतरही अध्यक्ष निवडीसाठी आवश्यक असलेली संचालकांची उपस्थिती निश्चित करणे समविचारी आघाडीसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. त्यामुळे २९ ऑक्टोबरच्या सभेपूर्वी दोन्ही आघाड्यांच्या हालचालींकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

अध्यक्षपदासाठी शशिकांत पाटील-चुयेकर यांचे नाव समविचारी आघाडीकडून निश्चित मानले जात आहे. सतेज पाटील यांनी पॅनेलची घोषणा करतानाच त्यांच्या नावाची घोषणा केली होती. मात्र, अध्यक्ष निवडीच्या सभेतील कोरमचा प्रश्न सोडविण्यासाठी आघाडीला संचालकांची उपस्थिती निश्चित करावी लागणार आहे.

दुसरीकडे, महायुतीला आपला उमेदवार निवडून आणण्यासाठी दोन संचालकांची साथ आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंकडून संचालकांशी संपर्क साधला जात असून, पुढील रणनीतीबाबत चर्चा सुरू आहे. महायुतीतील एखादा संचालक समविचारी आघाडीच्या बाजूने येतो का, याची चाचपणी केली जात असल्याची चर्चा आहे.

# जरांगेंचा एकनाथ शिंदेंवर ५०० कोटींच्या आरोपाचा दावा

**श्रीकांत शिंदेंच्या माध्यमातून पैसे दिल्याचा आरोप ; नाम. शिंदेंनी मागितले पुरावे**

■ छत्रपती संभाजीनगर,ता.२२ –

**मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत ५०० कोटी रुपयांच्या कथित व्यवहाराचा गंभीर आरोप केल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. शिंदे यांच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे यांना ५०० कोटी रुपये दिल्याची भाजपमध्ये चर्चा सुरू असल्याचा दावा जरांगे यांनी केला आहे. या आरोपांमुळे दोघांमधील शाब्दिक वादाला नवे वळण मिळाले आहे.**

या आरोपांवर प्रतिक्रिया देताना एकनाथ शिंदे यांनी मनोज जरांगे यांच्याकडे पुरावे सादर करण्याची मागणी केली. आपण कोणालाही ५०० कोटी रुपये दिलेले नाहीत आणि घेतलेलेही नाहीत, असे स्पष्ट करत त्यांनी जरांगे यांचे आरोप फेटाळून लावले.

दरम्यान, मनोज जरांगे यांनी ज्या ऑडिओ क्लिपचा उल्लेख केला आहे, ती प्रसारमाध्यमांना ऐकवण्यात आल्याचा दावा करण्यात येत आहे. संबंधित क्लिप महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी झालेल्या भाजपच्या एका कॉन्फरन्स बैठकीतील असल्याचे सांगितले जात आहे. या कथित ऑडिओमध्ये भाजपच्या आयटी सेलमधील एका महिला सदस्याने श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून मनोज जरांगे यांच्यापर्यंत ५०० कोटी रुपये पोहोचल्याचा दावा केल्याचे वृत्त आहे. एकनाथ शिंदे यांनी आरोप फेटाळून पुरावे मागितल्याने या प्रकरणातील राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कथित ऑडिओ क्लिपमधील दावे आणि संबंधित नेत्यांच्या भूमिका याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

**ठोस पुरावे द्या, सरकार चौकशी करेल**

मनोज जरांगे यांनी जाहीर केलेल्या कथित ऑडिओ क्लिप संदर्भात बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे कि, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बदनाम करण्याचे हे षडयंत्र असावे. मनोज जरांगे यांनी ठोस पुरावे असतील तर द्यावेत, शिवाय त्यांनी माध्यमांत बोलण्यापेक्षा पोलिस किंवा जिल्हाधिकारी यांचेकडे तक्रार करावी. त्याप्रकरणी सरकार त्याची निष्पक्ष चौकशी करेल.

# आळतेत आज बंद

हातकणंगले,ता.२२(प्रतिनिधी)–

**माणगाव येथील अल्पवयीन मुलगी स्वरा उपाध्येच्या अमानुष हत्येबद्दल सर्वत्र संतापाची लाट पसरली आहे. या खून प्रकरणातील नराधमांवर जलद गती न्यायालयात खटला चालवून त्याला लवकरात लवकर फाशीची शिक्षा द्यावी, या मागणीसाठी शुक्रवारी आळते गाव बंद ठेऊन सर्व व्यवहार बंद ठेवले जाणार आहेत. सायंकाळी गावातून कँडल मार्च काढून निषेध नोंदवला जाणार आहे .**

या मागणीसाठी वीर सेवा दल मध्यवर्ती समितीच्या वतीने ही डिजिटल स्वाक्षरी मोहीम राबविण्यात येत आहे.

# ऑडिओ क्लिपची सायबर सेलकडून चौकशी करा

**उदय सामंत यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी**

■ कोल्हापूर,ता.२२(प्रतिनिधी)–

**मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी सादर केलेल्या ऑडिओ क्लिपची फॉरेन्सिक लॅब आणि सायबर सेलकडून सखोल चौकशी करावी, अशी मागणी मंत्री उदय सामंत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. या क्लिपमधील आवाजांची सत्यता तपासून संबंधित व्यक्तींच्या आवाजाचे नमुने पडताळावेत. क्लिपमधून मराठा समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न झाला असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची बदनामी करण्याचे षड्यंत्र असल्याचा आरोपही सामंत यांनी केला. कोल्हापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.**

सामंत म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाचे आंदोलन योग्य पद्धतीने हाताळले होते. मराठा समाजाला न्याय देण्याची त्यांची भूमिका होती. मात्र, या ऑडिओ क्लिपमध्ये त्यांच्याबद्दल बदनामीकारक वक्तव्ये ऐकायला मिळतात. क्लिपमधील काही आवाज भाजपच्या सोशल मीडिया विभागाशी संबंधित श्वेता शालिनी, आमदार अतुल भातखळकर आणि यूट्यूबर सुशील कुलकर्णी यांच्यासारखे असल्याचा दावा केला जात आहे. या आवाजांची सत्यता तपासणीतून समोर आली पाहिजे.

या क्लिपमध्ये खास. डॉ. श्रीकांत शिंदेंचा उल्लेख करून त्यांच्याबद्दलही बदनामीकारक चर्चा करण्यात आल्याचा आरोप सामंत यांनी केला. जरांगे-पाटील यांना डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ५०० कोटी रुपये दिल्याचे वक्तव्य क्लिपमध्ये श्वेता शालिनी यांच्याशी संबंधित आवाजातून ऐकू येत असल्याचा दावा त्यांनी केला. या दाव्याचे पुरावे संबंधित व्यक्तीने सादर करावेत, अशी मागणी सामंत यांनी केली.

# सांडपाण्याच्या कारणावरून मारहाण

**पाचजणांवर गुन्हा**

■ इचलकरंजी,ता.२२ –

**रस्त्यावर पडलेले सांडपाणी आपल्या बाजूने ढकलल्याच्या कारणावरुन झालेल्या वादातून मारहाणीचा प्रकार घडला. या प्रकरणी शहापूर पोलिस ठाण्यात परस्पर विरोधी फिर्यादी दाखल करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ५ जणांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

याबाबत पोलिसांतून मिळालली माहिती अशी, फिर्यादी व संशयित आरोपी हे परस्परांच्या घरासमोर राहण्यास आहेत. सांगली रोडवरील आर.के.नगर भागात राहण्यास असलेल्या मिनाज इब्राहीम जमादार यांच्या फिर्यादीत, आशा अनिल चौगुले (वय ३९), श्रीमती सुमन तुकाराम जाधव (वय ६०) आणि प्रकाश तुकाराम जाधव (वय ४० सर्व रा.नेत्रा हॉटेलच्या मागे यड्राव) या तिघांनी मिळून सांडपाणी खराट्याने त्यांच्या बाजूस ढकलत असल्याच्या रागातून अश्लिल शिवीगाळ केली. तसेच प्रकाश जाधव यांनी काठीने इब्राहीम जमादार यांच्या पाठीत मारुन जखमी केल्याचे म्हटले आहे. या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, आशा अनिल चौगुलयांच्या फिर्यादीत, त्या आपल्या घरासमोर झाडू मारत असताना मिनाज इब्राहीम यांनी घरासमोर साठलेले सांडपाणी झाडूने चौगुले यांच्या घराकडे ढकलले. त्याचा जाब विचारत असताना मिनाज यांनी अश्लिल भाषेत शिवीगाळ करत व हाताने मारहाण करत ढकलून दिले. तर इब्राहीम जमादार यांनीही शिवीगाळ करत धमकी दिल्याचे नमूद केले आहे. या प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुचाकीच्या धडकेत मुलगी जखमी

■ इचलकरंजी,ता.२२–

भरधाव दुचाकीने पाठीमागून धडक दिल्याने मुलगी जखमी झाल्याची घटना वाकरेकर मळा कबनूर येथे घडली. या प्रकरणी तुषार पवार (रा. कबनूर) याच्यावर शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वरा पाटील असे जखमीचे नांव असून या प्रकरणी प्रियंका सुकुमार पाटील (रा.वाकरेकर मळा) यांनी फिर्याद दिली आहे. प्रियंका पाटील या आपली मुलगी स्वरा हिला घेऊन जात असताना पंचगंगा कारखान्याकडून कबनूर ओढ्याकडे निघालेल्या भरधाव दुचाकी (क्र. एमएच ५१ जी ६६८६) ने जोराची धडक दिली. त्यामध्ये स्वरा ही जखमी झाली आहे.

# तुळशीदास चव्हाण यांचे निधन

इचलकरंजी,ता.२२ –



आमराई मळा येथील प्रतिष्ठित नागरिक व सामाजिक कार्यकर्ते तुळशीदास पुंडलिक चव्हाण यांचे गुरुवार दि. २२ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, ५ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त होत आहे.

# न्यू कॉलेज ऑफ फार्मसीतर्फे गरबा-दांडिया उत्सव



कोल्हापूर ता.२२ (प्रतिनिधी) –

**श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचलित न्यू कॉलेज ऑफ फार्मसी आणि न्यू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने गरबा-दांडिया उत्सव झाला.**

सांस्कृतिक सहभागाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे न्यू कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. रवींद्र कुंभार यांनी सांगितले.

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या संचालिका स्वाती निगडे, श्रीमती सविता पाटील, न्यू इन्स्टिटयूट ऑफ टेकनॉलॉजीचे प्राचार्य डॉ. संजय डाभोळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पारंपरिक वेशभूषा, आकर्षक सजावट, पारंपरिक संगीत आणि गरबा-दांडियाच्या तालावर विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. या उत्सवाला विद्यार्थ्यांचा तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.


॥ हार्दिक शुभेच्छा ॥



मा.श्री. सुनिल सिताराम महाजन



सौ.विजयालक्ष्मी सुनिल महाजन (दीदी)



सौ. अलका अशोकराव स्वामी
मा. नगराध्यक्षा- इचलकरंजी नगरपरिषद
चेअरमन- विरशैव को-ऑप. बँक लि. इचलकरंजी

आमचे हितचिंतक,
इचलकरंजी नगरपरिषदेचे
मा. उपनगराध्यक्ष ,
**मा.श्री. सुनिल सिताराम महाजन**
व इचलकरंजी महानगरपालिकेच्या
नगरसेविका ,
**सौ. विजयालक्ष्मी सुनिल महाजन**
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा..!



* शुभेच्छुक *

संग्राम अशोकराव स्वामी -युवा नेते


मा. स्वप्नील आवाडे साहेब
चेअरमन, KJSB
मा. राजू चव्हाण साहेब
मा. विजय पाटील साहेब
मा. सरपंच, यड्राव
पक्षभेदांच्या पलीकडे जपत मैत्रीचा
अनमोल ऋणानुबंध...
इचलकरंजी महानगरपालिकेचे
विरोधी पक्षनेते
मा. उदयसिंग मारुती पाटील
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
सौ. मनीषा कुपटे
नगरसेविका, इचलकरंजी महानगरपालिका. भाजपा
श्री. संतोष आण्णा कुपटे
सामाजिक कार्यकर्ते
श्री. दीपक चव्हाण
युवा उद्योजक
BRANDO MEDIA
अवधूत संतोष कुपटे | विशाल वसंत चव्हाण
विशाल टेक्स्टाईल | चव्हाण ग्रुप

सुविचार :- ''स्त्री ही केवळ कुटुंबाची शोभा नसते,तर प्रसंगी मातृभूमीसाठी रणरागिणी बनून शत्रूला धूळ चारण्याची ताकदही तिच्यात असते.''

■ संपादकीय ■

# हितसंबंधांची कसोटी

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांच्या भारतभेटीमुळे दोन्ही देशांमधील संबंधांना पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे. गेल्या काही महिन्यांत आयातशुल्क, व्हिसा निर्बंध, स्थलांतर धोरण, आऊटसोर्सिंग आणि रशियन तेलाच्या खरेदीवरून भारत व अमेरिका यांच्यात मतभेद निर्माण झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आर्थिक दबावाचा वापर परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून करण्यास सुरुवात केल्याने या संबंधांमधील तणाव वाढला. अशा परिस्थितीत रुबियो यांचा दौरा महत्त्वाचा ठरतो. मे महिन्यातील भारतभेटीत त्यांनी दोन्ही देशांमधील दुरावा कमी करण्याचा प्रयत्न केला होता. यावेळी मात्र त्यांच्या दौऱ्याचा केंद्रबिंदू नवी दिल्लीऐवजी मुंबई आणि जामनगर आहे. या बदलामागे राजनैतिक संकेत आहेत की आर्थिक हितसंबंध, यावर चर्चा सुरू झाली आहे. विशेषतः भारत–अमेरिका संबंधांमध्ये खासगी उद्योगसमूहांचे वाढते महत्त्व आणि अमेरिकेच्या अंतर्गत राजकारणाचा प्रभाव लक्षात घेता या भेटीचे विश्लेषण व्यापक दृष्टिकोनातून करणे आवश्यक ठरते. आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये आर्थिक हितसंबंधांचा प्रभाव वाढत असल्याचे या दौऱ्यातून स्पष्ट होते. अमेरिकेचे परराष्ट्र धोरण आता अधिक व्यवहारकेंद्रित होत चालले आहे. गुंतवणूक, व्यापार, तंत्रज्ञान आणि रोजगारनिर्मिती यांचा राजनैतिक वाटाघाटींमध्ये थेट वापर केला जात आहे. रुबियो यांच्या जामनगर भेटीकडे याच संदर्भातून पाहावे लागेल. रिलायन्स इंडस्ट्रीजच्या अधिकाऱ्यांशी त्यांच्या संभाव्य चर्चेला अमेरिकेतील प्रस्तावित तेलशुद्धीकरण प्रकल्पाची पार्श्वभूमी आहे. टेक्सासमधील ब्राऊन्सव्हिल येथे मोठ्या गुंतवणुकीच्या प्रकल्पाची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. या प्रकल्पाशी संबंधित व्यावसायिक करारांना गती देणे, हा रुबियो यांच्या भेटीमागील एक उद्देश असू शकतो. या घडामोडींना अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांचाही संदर्भ आहे. ट्रम्प यांच्यासाठी देशांतर्गत गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती हे महत्त्वाचे राजकीय मुद्दे आहेत. टेक्सासमध्ये नवीन औद्योगिक प्रकल्प उभारला गेल्यास त्याचा लाभ रिपब्लिकन पक्षाला निवडणूक प्रचारात घेता येईल. ब्राऊन्सव्हिल परिसरातील कामगारवर्ग आणि लॅटिन अमेरिकी वंशाचे मतदार लक्षात घेता अशा प्रकल्पाला राजकीय महत्त्व प्राप्त होऊ शकते. अर्थात, एखाद्या औद्योगिक करारामागील उद्देश पूर्णतः निवडणुकीशी संबंधित आहे, असे मानता येणार नाही. तथापि, ट्रम्प यांच्या आर्थिक राष्ट्रवादात देशांतर्गत राजकीय लाभ आणि आंतरराष्ट्रीय व्यापार धोरण यांची सांगड स्पष्टपणे दिसते. यातून एक मूलभूत प्रश्न निर्माण होतो. दोन सार्वभौम राष्ट्रांमधील संबंध खासगी उद्योगसमूहांच्या हितसंबंधांभोवती केंद्रित होऊ लागले तर व्यापक राष्ट्रीय हिताचे स्थान काय राहते? आंतरराष्ट्रीय राजकारणातील वास्तववादी सिद्धान्तानुसार प्रत्येक देश आपली आर्थिक आणि सामरिक ताकद वापरून राष्ट्रीय हितसंबंध सुरक्षित करण्याचा प्रयत्न करतो. अमेरिकेची सध्याची भूमिका याच सिद्धान्ताशी सुसंगत आहे. मात्र, आर्थिक सामर्थ्याचा वापर परस्पर सहकार्याऐवजी दबाव निर्माण करण्यासाठी झाला तर समान भागीदारीच्या तत्त्वाला बाधा पोहोचते. भारताने अमेरिकेशी संबंध वाढवताना या वास्तवाकडे दुर्लक्ष करता कामा नये. रशियन तेलाच्या खरेदीवरून निर्माण झालेला वाद हे त्याचे उदाहरण आहे. भारताने ऊर्जा सुरक्षेसाठी रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी करण्याचे धोरण स्वीकारले. अमेरिकेने मात्र या व्यवहारांवर निर्बंध आणि अतिरिक्त आयातशुल्क लादण्याचा इशारा दिला. आता प्रस्तावित कठोर कारवाई पुढे ढकलल्यामुळे भारताला तात्पुरता दिलासा मिळाला आहे. तथापि, अमेरिकेच्या धोरणातील अनिश्चितता कायम आहे. भविष्यात निर्बंधांचा प्रश्न पुन्हा उपस्थित होऊ शकतो. विशेष म्हणजे, अमेरिकेलाही ऊर्जा बाजारातील परिस्थितीनुसार रशियाशी व्यवहार करण्याची आवश्यकता भासते. स्वतःच्या आर्थिक गरजांसाठी लवचीक धोरण स्वीकारताना इतर देशांकडून मात्र कठोर निर्बंधांचे पालन करण्याची अपेक्षा ठेवणे हा विरोधाभास आहे. भारताच्या दृष्टीने ऊर्जा सुरक्षा हा राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा अत्यंत संवेदनशील विषय आहे. कच्च्या तेलाच्या किमतीतील वाढीचा परिणाम वाहतूक, उद्योग, शेती आणि महागाईवर होतो. त्यामुळे तेलाची खरेदी कोणत्या देशाकडून करावी, याचा निर्णय आर्थिक व्यवहार्यता आणि राष्ट्रीय गरजांच्या आधारे घेण्याचे स्वातंत्र्य भारताला असले पाहिजे. अमेरिकेशी मैत्री टिकविण्यासाठी ऊर्जा धोरणावरील स्वायत्तता गमावणे दीर्घकालीन हिताचे ठरणार नाही. भारताने आपल्या बहुपक्षीय परराष्ट्र धोरणाचा आधार कायम ठेवला पाहिजे. अमेरिका, रशिया, युरोप आणि पश्चिम आशियातील देशांशी स्वतंत्र संबंध राखण्याची क्षमता हेच भारताचे राजनैतिक सामर्थ्य आहे.

# सोन्याच्या अंगठीचे राजकारण

**कुटुंबात नव्या बाळाचे आगमन झाल्यावर नातेवाईक, आप्तेष्ट कपडे, खेळणी अथवा मिठाई घेऊन आनंदात सहभागी होतात, हा सर्वसामान्य सामाजिक प्रघात आहे. मात्र, दक्षिण भारतातील तमिळनाडू राज्यात सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जन्म घेणाऱ्या नवजात बालकांना शासनाकडून एक अत्यंत अनोखी भेट दिली जात आहे, ती म्हणजे सोन्याची अंगठी.**

तमिळनाडू सरकारने 'ताई मामन थंगा मोथिरम' नावाने ही योजना अधिकृतरीत्या सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत सरकारी रुग्णालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये जन्माला येणाऱ्या बाळांना एक ग्रॅम वजनाची बावीस कॅरेट सोन्याची अंगठी भेट म्हणून दिली जात आहे. मदुरै येथील शासकीय राजाजी रुग्णालयातून या योजनेचा शुभारंभ करताना स्वतः मुख्यमंत्र्यांनी नवजात बालकांना अंगठ्या घालून या उपक्रमाची सुरुवात केली. या कार्यक्रमात राज्याचे आरोग्यमंत्रीही उपस्थित होते. सरकारी तिजोरीतून सोन्याची अंगठी देण्याचा हा निर्णय केवळ एक औपचारिक अथवा वरवरचे कौतुक वाटू नये, तर यामागे सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेविषयी जनमानसात विश्वास निर्माण करण्याचा आणि संस्थात्मक प्रसुतीला प्रोत्साहन देण्याचा एक मोठा सामाजिक उद्देश जोडलेला आहे, असा सरकारचा दावा आहे. योजनेच्या शीर्षकात वापरण्यात आलेला 'ताई मामन थंगा मोथिरम' हा शब्दप्रयोग तमिळ संस्कृतीतील एका भावनिक परंपरेकडे निर्देश करतो. त्याचा ढोबळ अर्थ 'मामाची सोन्याची अंगठी' असा होतो. तमिळ संस्कृतीत आईच्या भावाला म्हणजेच मामाला कौटुंबिक व्यवस्थेत अत्यंत आदराचे आणि महत्त्वाचे स्थान असते. बाळाच्या जन्मानंतर सर्वात आधी पोहोचून शुभाशीर्वाद देणाऱ्या मामाची ही भूमिका आता सरकारने स्वतःकडे घेतली असून, शासन एका जबाबदार कुटुंबाप्रमाणे प्रत्येक बालकाच्या जन्माच्या आनंदात सहभागी होत आहे, असा संदेश देण्याचा हा प्रयत्न आहे. या योजनेचा मूळ हेतू केवळ मोफत सोने वाटप करणे हा नसून, घरात होणाऱ्या असुरक्षित बाळंतपणांना आळा घालून संस्थात्मक प्रसूतीचे



प्रमाण शंभर टक्क्यांपर्यंत नेणे हा आहे. संस्थात्मक प्रसूतीचा थेट अर्थ म्हणजे प्रसूती ही घराऐवजी मान्यताप्राप्त रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे अथवा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये घडवून आणणे. अशा ठिकाणी प्रशिक्षित डॉक्टर, परिचारिका, सुईणी आणि अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध असतात. प्रसूतीदरम्यान आई किंवा बाळाला काही गुंतागुंत निर्माण झाल्यास तातडीने उपचार मिळण्याची व्यवस्था येथे असते. भारतातील माता आणि अर्भक मृत्यूदर रोखण्यासाठी संस्थात्मक प्रसूतीला अनेक वर्षांपासून आरोग्य धोरणात सर्वोच्च प्राधान्य दिले जात आहे. तमिळनाडू सरकारचा असा युक्तिवाद आहे की, सरकारी व्यवस्थेत जन्माला येणाऱ्या बालकांना सन्मान आणि भेटवस्तू दिल्यास सर्वसामान्य कुटुंबे शासकीय आरोग्य केंद्रांकडे आकृष्ट होतील. नागरिकांनी सरकारी रुग्णालयांकडे केवळ 'मोफत उपचारांची जागा' म्हणून न पाहता, हक्काचे आणि सुरक्षित आरोग्याचे केंद्र म्हणून पाहावे, हा मानस यामागे आहे. मात्र, या योजनेवरून वैद्यकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली आहे. काही सामाजिक घटकांनी आणि तमिळिसाई सौंदरराजन यांच्यासारख्या नेत्यांनी या योजनेचे स्वागत करतानाच रुग्णालयांमधील पायाभूत सुविधा, आहार आणि सुरक्षेवर भर देण्याची गरज अधोरेखित केली आहे. नवजात बाळाला सोन्याची अंगठी देणे हे स्वागतार्ह पाऊल असू शकते, पण त्याचबरोबर गरीब कुटुंबांसाठी पुरेशा पोषण आहाराची उपलब्धता अधिक महत्त्वाची ठरते. प्रसूतीनंतर माता आणि बाळाला सुरक्षित घरी पोहोचवण्यासाठी सक्षम रुग्णवाहिका आणि मदत यंत्रणेची गरज असते, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. या चर्चेतून एक कळीचा प्रश्न निर्माण होतो की, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास भेटवस्तूंमुळे वाढतो की रुग्णालयातील स्वच्छता, पुरेशा खाटा, अनुभवी डॉक्टर, मोफत औषधे आणि सुरक्षित वातावरणामुळे निर्माण होतो? भारतातील बहुतांश गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी सरकारी रुग्णालये हीच आरोग्याची मुख्य जीवनरेखा आहेत. तरीही या रुग्णालयांसमोर अनेक दशकांपासून अनेक आव्हाने उभी आहेत. रुग्णांचा प्रचंड ताण, खाटांची कमतरता, वैद्यकीय कर्मचाऱ्यांवरील कामाचा भार, चाचण्यांसाठी लागणाऱ्या लांबलचक रांगा आणि औषधांचा तुटवडा या प्राथमिक समस्या आजही अनेक भागांत कायम आहेत. प्रसूतीच्या वेळी वेळेवर तपासणी होणे, आवश्यकतेनुसार शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध असणे आणि आपत्कालीन स्थितीत तत्पर सेवा मिळणे या बाबी एखाद्या कुटुंबासाठी सोन्याच्या अंगठीपेक्षा कित्येक पटीने अधिक महत्त्वाच्या असतात. केवळ आर्थिक आमिष किंवा भेटवस्तू देऊन विश्वासाची पोकळी भरून काढता येत नाही; त्यासाठी रुग्णालयातील आतिथ्य आणि उपचारांची गुणवत्ता निर्दोष असावी लागते. याशिवाय रुग्णालयांच्या अंतर्गत सुरक्षेचा मुद्दाही तितकाच गंभीर आहे. देशातील विविध भागांतील सरकारी रुग्णालयांमध्ये आगी लागण्याच्या, विजेच्या धक्क्याने दुर्घटना घडण्याच्या आणि विशेषतः नवजात शिशु कक्षांमध्ये सुरक्षिततेचा अभाव असल्याच्या घटना वेळोवेळी घडल्या आहेत. अशा दुर्दैवी घटनांमुळे संपूर्ण सरकारी आरोग्य व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उभे राहते. अशा पार्श्वभूमीवर, सरकारी रुग्णालयांमधील अग्नीसुरक्षा, आपत्कालीन मार्ग आणि अतिदक्षता विभागांची काटेकोर तपासणी याकडे दुर्लक्ष करून केवळ लोकप्रिय घोषणा करणे योग्य ठरणार नाही.

दैनंदिनी

# विविध देशांमधील चळवळीमागे धनाढ्य परकीय शक्तींचा हात?

**दक्षिण आशियाई देशांमधील विविध सामाजिक, राजकीय किंवा लोकशाही चळवळींमागे परकीय शक्तींचा हात आहे का, हा जागतिक राजकारणातील एक अत्यंत जटिल आणि वादग्रस्त विषय आहे. अमेरिका आणि युरोपीय देश जागतिक स्तरावर लोकशाही,मानवाधिकार आणि मुक्त बाजारपेठेचा प्रसार करण्यासाठी विविध संस्थांना निधी देतात. अनेकदा असा आरोप केला जातो की, पाश्चात्य देशांमधील काही संस्था किंवा विशिष्ट सरकारी अनुदान संस्था स्थानिक अशासकीय संस्थांना (एनजीओएस) निधी पुरवून तिथल्या सरकारविरोधी आंदोलनांना किंवा चळवळींना प्रोत्साहन देतात. आपल्या धोरणांना अनुकूल नसलेली सरकारे बदलण्यासाठी किंवा त्यांच्यावर दबाव आणण्यासाठी पाश्चात्य देश अशा चळवळींना छुप्या पद्धतीने किंवा उघडपणे पाठिंबा देतात, असा एक मोठा मतप्रवाह आहे.**

जागतिक स्तरावर विशेषतः युरोपियन देश आणि पश्चिम आशियातील देशांमध्ये जी आंदोलने सुरू आहेत या आंदोलनामागे पश्चिम देश असल्याचा आरोप होत आहे? युरोप आणि दक्षिण आशियातील सध्याच्या आंदोलनांमागे पाश्चात्य किंवा बाह्य शक्ती असल्याचा दावा पूर्णपणे सिद्ध झालेला नाही; त्याऐवजी तज्ञ या आंदोलनांना प्रामुख्याने स्थानिक आणि आर्थिक संकटांशी जोडतात. फ्रान्स, बेल्जियम, इटली, स्पेन आणि अल्बानिया यांसारख्या अनेक प्रमुख युरोपीय देशांमध्ये अलीकडे युवा पिढीचा मोठा ओघ दिसून आला आहे. फ्रान्स आणि इटलीसारख्या देशांमध्ये, विद्यार्थी शैक्षणिक धोरणे,शिक्षकांची कमतरता आणि अर्थसंकल्पीय कपातीचा निषेध करत आहेत. बेल्जियम आणि स्पेनमध्ये, विद्यार्थी आणि सामान्य जनता उच्च शिक्षणाचा वाढता खर्च आणि घरांच्या कमतरतेचा सामना करत आहेत. अल्बानियासारख्या देशांमध्ये, लोक पंतप्रधानांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी रस्त्यावर उतरत आहेत, जिथे बेरोजगारी आणि प्रशासकीय भ्रष्टाचार या मुख्य समस्या आहेत. काही विश्लेषकांचा विश्वास आहे की या आंदोलनांना डाव्या विचारसरणीच्या संघटना आणि स्थलांतरित गटांकडून खतपाणी घातले जात आहे, परंतु याला थेट पाश्चात्य कट म्हणता येणार नाही, कारण या चळवळी पाश्चात्य देशांमध्येच घडत आहेत.दक्षिण आशियातील (उदा. बांगलादेश, नेपाळ, इत्यादी) अलीकडील सत्तांतरे आणि विद्यार्थी आंदोलनांमागे खोलवर रुजलेली देशांतर्गत कारणेही आहेत आर्थिक अस्थिरता आणि रोजगाराचे संकट बेरोजगारी, सरकारी धोरणांविरुद्धचा संताप आणि महागाई ही या देशांमधील आंदोलनांची प्रमुख कारणे आहेत. दक्षिण आशियामध्ये अनेकदा असे आरोप केले जातात की, अमेरिका किंवा इतर पाश्चात्य देश आपले भू-राजकीय हितसंबंध पुढे नेण्यासाठी सरकारांवर दबाव आणण्याकरिता किंवा सत्तापालट घडवून आणण्याकरिता स्थानिक असंतोषाचा गैरफायदा घेतात. तथापि, ठोस आंतरराष्ट्रीय गुप्तचर पुराव्यांशिवाय,याला अधिकृतपणे केवळ एक सिद्धांत किंवा राजकीय आरोप मानले जाते.

थोडक्यात सांगायचे तर, कोणत्याही चळवळीचे मूळ हे तिथल्या स्थानिक समस्या आणि जनतेच्या असंतोषात असते.मात्र, एकदा का चळवळ सुरू झाली की,पाश्चात्य देशांसह इतर जागतिक महासत्ता (उदा.चीन किंवा रशिया) आपापल्या फायद्यासाठी त्या परिस्थितीचा राजकीय वापर करण्याचा किंवा त्याला विशिष्ट वळण देण्याचा प्रयत्न नक्कीच करतात.

■ प्रा.डॉ.सुधीर अग्रवाल



**भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अनेक शूरवीरांनी आपल्या प्राणांची बाजी लावून परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष केला. या शूरवीरांमध्ये कित्तूरच्या राणी चेन्नम्मा यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणांना विरोध करून आपल्या राज्याचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्यांनी सशस्त्र लढा दिला. त्यांच्या धैर्याने, स्वाभिमानाने आणि देशप्रेमाने भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात एक प्रेरणादायी अध्याय निर्माण केला.**

## ब्रिटीशांविरूध्द लढणारी स्वातंत्र्य सेनानी

# राणी कित्तूर चेन्नम्मा

राणी चेन्नम्मा यांचा जन्म २३ ऑक्टोबर १७७८ रोजी कर्नाटकातील तत्कालीन बेळगाव जिल्ह्यातील काकाटी या गावात झाला. धुळप्पा आणि पद्मावती यांच्या पोटी जन्मलेल्या चेन्नम्मा यांचा विवाह वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी कित्तूरचे राजे मल्लसर्जा देसाई यांच्याशी झाला. विवाहानंतर त्या कित्तूरच्या राणी बनल्या. राजघराण्याच्या जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांनी राज्यकारभाराचे ज्ञान मिळवले आणि प्रजेच्या हिताला महत्त्व दिले. राणी चेन्नम्मा यांच्या आयुष्यात १८१६ मध्ये पतीचे निधन झाल्यामुळे मोठे दुःख कोसळले. त्यानंतर १८२४ मध्ये त्यांच्या एकुलत्या एका मुलाचाही मृत्यू झाला. कित्तूरच्या राजगादीचा वारसा कायम राहावा, या उद्देशाने त्यांनी शिवलिंगप्पा या मुलाला दत्तक घेतले. मात्र, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला भारतीय संस्थानांवर आपले नियंत्रण वाढवायचे होते. ब्रिटिशांनी शिवलिंगप्पाला वारसदार म्हणून मान्यता देण्यास नकार दिला. राणी चेन्नम्मा यांनी हा अन्याय स्वीकारला नाही. ऑक्टोबर १८२४ मध्ये ब्रिटिश सैन्याने मोठ्या लष्करी ताकदीसह कित्तूरवर हल्ला केला. ब्रिटिशांकडे हजारो सैनिक, बंदुका आणि तोफखाना होता. त्यांच्यासमोर कित्तूरचे सैन्य संख्येने कमी असले, तरी राणीच्या नेतृत्वाखाली सैनिकांनी प्रचंड धैर्याने प्रतिकार केला. या पहिल्या युद्धात ब्रिटिश सैन्याचे मोठे नुकसान झाले. ब्रिटिश अधिकारी सेंट जॉन यांचाही मृत्यू झाला. राणीच्या सैन्यातील सेनापती अमातूर बाळाप्पा यांनी या लढाईत महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. या विजयामुळे राणी चेन्नम्मा यांच्या शौर्याची चर्चा सर्वत्र होऊ लागली.

ब्रिटीशांविरूध्द दुसऱ्या युद्धातही कित्तूरच्या सैनिकांनी शर्थीने लढा दिला. अनेक दिवस किल्ल्याचे रक्षण करण्याचा प्रयत्न सुरू होता. परंतु अंतर्गत फितुरीमुळे राणीच्या सैन्याला मोठा धक्का बसला. ब्रिटिशांच्या प्रचंड सैन्यबळासमोर कित्तूरच्या सैन्याची ताकद अपुरी पडली. अखेर राणी चेन्नम्मा यांचा पराभव झाला आणि ब्रिटिशांनी त्यांना अटक केली. त्यानंतर त्यांना बेळहोंगल किल्ल्यात कैदेत ठेवण्यात आले.

राणी चेन्नम्मा यांना आयुष्याची अखेरची सुमारे पाच वर्षे बेळहोंगलच्या किल्ल्यात बंदिवासात घालवावी लागली. २१ फेब्रुवारी १८२९ रोजी बेळहोंगल किल्ल्यात त्यांचे निधन झाले. ब्रिटिशांनी त्यांचा लढा दडपला असला, तरी त्यांच्या शौर्याची ज्योत विझवता आली नाही. राणी चेन्नम्मा या केवळ कित्तूरच्या राणी नव्हत्या, तर भारतीय स्त्रीशक्तीचे आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचे तेजस्वी प्रतीक होत्या. त्यांचे शौर्य आणि त्याग भारतीयांच्या स्मरणात सदैव जिवंत राहतील.

■ जगन घाणेकर

## वाचकांचा पत्रव्यवहार

### सुशिक्षित मतदारसंघात अशिक्षित राजकारण

मी पुणे पदवीधर मतदारसंघाचा नोंदणीकृत मतदार आहे. आज २३ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या विधान परिषदेच्या पदवीधर निवडणुकीत मी मतदान करणार आहे. परंतु दोन दिवसांपूर्वी माझ्यासह अनेक मतदारांना दोन वेगवेगळ्या राजकीय पक्ष, उमेदवार व कार्यकर्त्यांकडून दोन वेगवेगळे मेसेज आले आहेत. एका उमेदवाराने सांगितले की माझे मतदान केंद्र गडहिंग्लज येथे आहे, ते चुकीचे आहे. तर दुसऱ्या पक्षाने सांगितले की ते इचलकरंजी येथे आहे. हे ठिकाण बरोबर असले तरी, प्रश्न असा आहे की चुकीची माहिती दुसऱ्या उमेदवाराने, पक्षाने का दिली? हा प्रकार निंदनीय आहे. चुकीच्या मतदान केंद्राचे मेसेज पाठवणे ही लोकशाहीची क्रूर थट्टा आहे. हा हलगर्जीपणा, योगायोग आहे की मतदाराला फसवण्याचा पद्धतशीर डाव?

आम्ही पदवीधर मतदार सहसा आपल्या कामात व्यस्त असतो.पुणे, कोल्हापूर, सांगलीत कुठेही नोकरी करत असेन आम्हाला जर मतदानाच्या आदल्या दिवशी सांगितले की, तुमचे मतदान ६५ ते ७० किमी लांब गडहिंग्लजला आहे, तर आम्ही मतदानाचा विचारच सोडून देईन. आणि हाच तर काही लोकांचा हेतू आहे का? एखादा मतदार चुकीच्या केंद्रावर गेला तर त्याचे मतदान हुकणार, त्याचा दिवस वाया जाणार आणि लोकशाहीवरील विश्वास उडणार पदवीधर मतदारसंघात हे कितपत योग्य आहे ?

निवडणूक आयोगाच्या नियमानुसार मतदान केंद्राची माहिती देण्याचा अधिकार फक्त निवडणूक आयोगाला आहे. कोणताही पक्ष अधिकृत यादी बदलू शकत नाही. कोणत्याही पक्षाने स्वतःच्या सोयीसाठी चुकीचे केंद्र सांगणे,चुकीची माहिती पसरवणे हा आचारसंहितेचा भंग आहे. सर्व पदवीधर बांधवांना आवाहन करतो की, कोणत्याही पक्षाच्या मेसेजवर विश्वास ठेवू नका. आपले मतदान केंद्र फक्त अधिकृत वेबसाईटवर तपासा. कोणाच्याही व्हॉट्सअप मेसेजवर विश्वास ठेवू नका. स्वतःचे मतदान केंद्र स्वतः तपासा. आज २३ ऑक्टोबरला योग्य ठिकाणी जाऊन मतदान करा. एका खोट्या मेसेजने मत गमावू नका.

■ गजानन खडके,इचलकरंजी

### सतेज पाटलांचे महत्व पुन्हा एकदा अधोरेखित

नुकताच कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळची २५ जागेसाठी निवडणूक झाली.हि निवडणूक कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आणि कर्नाटकाच्या सीमाभागात गाजली. अतिशय अतीतटीच्या, संघर्षमय आणि प्रतिष्ठेच्या लढाईत काँग्रेस विधानपरिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्या समविचारी आघाडीला बहुमताचा१३ उमेदवारांची विजयी पताका घेऊन जादुई आकडा पार करता आला. या निवडणुकीत १ सीएम, २ डिसिएम,१० आमदार,१ खासदार,१ राज्यसभा खासदार,आणि २ मंत्री यांच्या विरोधात बंटी पाटलांनी निकराची झुंज देवून विजयाचा झेंडा फडकावला. त्यामुळे पुन्हा एकदा सतेज पाटलांच्या कार्यपद्धतीवर शिक्कामोर्तब झाले असून राबणारा नेता अशी त्यांची जनमाणसात प्रतिमा निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात बंटींचे महत्व वाढले आहे. या गोकुळच्या विजयाने राजकीय संदर्भ बदलले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.



महाराष्ट्राच्या बारामतीत या लाडक्या नेत्याचे भावी मुख्यमंत्री म्हणून फ्लेक्स झळकतं आहेत. सतेज पाटलांची एक खासियत आहे. एकदा का जबाबदारी घेतली की यशस्वीपणे पार पाडायची. त्यामुळे बंटींच्या राजकीय पॅटर्नची सातत्याने चर्चा होते. गोकुळची वार्षिक उलाढाल ४ हजार कोटींच्यावर असून ५ लाख दूध उत्पादक जोडले गेले आहेत. सरासरी दैनंदिन १६ ते २० लाख लिटर दुध संकलन होते. अशा या संघाचे नेतृत्व सतेज पाटलांच्याकडे आल्याने दुध उत्पादकांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. दिलेला शब्द पाळणारा, स्वच्छ प्रतिमेचा, आश्वासक चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते!

■ राजू जाधव

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**शुक्रवार,ता.२३.१०.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५३, शालिवहन शके १९४८,पराभव नामसंवत्सरे, दक्षिणायणे, शरद ऋतो, अश्विन मासे,शुक्ल पक्षे,द्वादशी तिथी,१४.३६ नंतर त्रयोदशी तिथी,पूर्वा भाद्रपदा नक्षत्र,२१.०३ नंतर उत्तरा भाद्रपदा नक्षत्र, कुंभ रास,१५.०४ नंतर मीन रास,ध्रुव योग,२२.०९ नंतर व्याघात योग,बालव करण १४.३६ नंतर, कौलवकरण २६.१३ पर्यंत, दिनमान ११.३३, सुर्योदय ६.३१, सुर्यास्त १८.०४ (कोल्हापूरचे) राहूकाळ सकाळी १०.३० ते १२, प्रदोष द्विदल व्रतारंभ, पयोव्रत समाप्ती, बोटेस्वामी आराधना, भा.कार्तिक आरंभ, संत बाळूमामा जन्मोत्सव आदमापूर,घबाड २१.०३ नंतर, मिरची लागवड,मालविक्री,स्थावरची देवघेव.

**ज्यो:केशव पेटकर महाराज-९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य ✻

**मेष**–एखादी आनंदाची बातमी मिळण्याची शक्यता आहे. नव्या आर्थिक करारांना अंतिम स्वरुप मिळाल्यामुळे ताजा अर्थपुरवठा होईल.कार्यालयीन काम फत्ते होईल.

**वृषभ**– सरकारी नोकरदार वर्गाने शांततेचे पालन करावे. घराच्या दृष्टीने केलेली गुंतवणूक फायदेशीर ठरेल.नवीन प्रकल्प राबविण्यासाठी उत्कृष्ट दिवस.

**मिथून**–गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते जुन्या गुंतवणुकीतून आज उत्तम नफा होऊ शकतो.

**कर्क**–तुमच्यापुढे लग्नाचा प्रस्ताव आल्याने तुमचे ओझे कमी झाल्यासारखे वाटेल.कार्यालयीन काम फत्ते होईल. सहकारी आणि वरिष्ठ दोघांचेही सहकार्य तुम्हाला मिळेल.

**सिंह**–उत्स्फूर्तपणे वागण्यावर नियंत्रण ठेवा. विवाह बंधनात अडकण्यासाठी उत्तम काळ.कलात्मक क्षेत्रातील लोकांना आजचा दिवस यशदायी ठरेल.

**कन्या**–कला व नाट्य क्षेत्रांशी संबंधित व्यक्तींना नवीन संधी मिळतीलआणि त्यांना त्यांची कलात्मकता उत्कृष्टपणे दाखविता येईल. तुमच्या जोडीदाराबरोबर अधिक काळ घालवेल.

**तुळ**–प्रदीर्घ काळापासून तुम्ही अनुभवत असलेले आयुष्यातील तणाव आणि ओढाताण यापासून थोडे मुक्त व्हाल. सगळे ताणतणाव दूर ठेवण्यासाठीजीवनशैली बदला.

**वृश्चिक**– आज तुमच्यासमोर सादर झालेल्या गुंतवणूक योजनांचा नीटपणे विचार करायला हवा.व्यावसायिकांना चांगला दिवस. प्रवास लाभदायक ठरेल.

**धनु**–धन संचय करण्यासाठी आज आपल्या घरातील लोकांसोबत तुम्हाला बोलण्याची आवश्यकता आहे. त्यांचा सल्ला तुमची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत करेल.

**मकर**–नवीन प्रकल्पांसाठी आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल.कामाच्या ठिकाणी तुम्ही केलेल्या कामाचे कौतुक होईल.तुमच्या व्यक्तिमत्वाला उभारी मिळेल.

**कुंभ**– तुमची अतिरिक्त ऊर्जा आणि प्रचंड उत्साह तुम्हाला सुयोग्य ठरतील असे निर्णय मिळतील आणि घरगुती तणाव सुकर करील. तुम्ही कठोर बोलण्यावर नियंत्रण ठेवा .

**मीन**– व्यवसायात प्रगती होईल.नोकरदारवर्गाचे तांत्रिक अडचणींमुळे राहिलेली कामे पूर्ण होतील. आर्थिकदृष्ट्या लाभ होईल.राजकीय क्षेत्रात मानसन्मान मिळेल.

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मँचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५. , दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०,सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.✻ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१.
टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

## दसऱ्याला वारणा श्रीखंडाची ४५० मे.टन विक्रमी विक्री

**भादोले,ता.२२ (वार्ताहर)–**

**दसरा सणानिमित्त वारणा दूध संघाकडून तब्बल ४५० मेट्रिक टन श्रीखंडाची विक्रमी विक्री झाल्याची माहिती वारणा समूहाचे अध्यक्ष आम. डॉ. विनय कोरे यांनी दिली.**

दसरा सणानिमित्त घरोघरी पारंपरिक मेजवानीला विशेष महत्त्व असते. हीच परंपरा जपत वारणा दूध संघाच्या दर्जेदार, स्वादिष्ट आणि गुणवत्तापूर्ण श्रीखंडाला ग्राहकांकडून मोठी पसंती मिळाली.गुणवत्ता, उत्पादनातील सातत्य, स्वच्छता, ग्राहकांच्या विश्वासाला प्राधान्य देण्याची परंपरा यामुळे वारणा श्रीखंडाने बाजारपेठेत वेगळे स्थान निर्माण केले. प्रभावी वितरण व्यवस्था आणि विक्री केंद्रांच्या माध्यमातून ग्राहकांच्या मागणीची पूर्तता करण्यावर संघाचा भर आहे.


### ।। हार्दिक शुभेच्छा ।।




मा.श्री. सुनिल सिताराम महाजन | सौ.विजयालक्ष्मी सुनिल महाजन (दीदी)

आमचे सहकारी मित्र **श्री. सुनिल सिताराम महाजन** व नगरसेविका **सौ. विजयालक्ष्मी सुनिल महाजन** यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**◆ तानाजी बाळू पोवार ◆**
नगरसेवक, इचलकरंजी महानगरपालिका
**◆ शंतनू तानाजी पोवार ◆**


### नावात बदल

मी माझे जुने नाव **नयना महावीर चौगुले** असे होते ते बदलून माझे नवीन नाव **वैशाली माणिक तपकिरे** केले आहे. हा बदल पासपोर्टसाठी आहे.

पत्ता
**आदिनाथ हौसिंग सोसायटी**
सांगली रोड, इचलकरंजी.


### हार्दिक शुभेच्छा!




श्री. सुनिल सिताराम महाजन | श्री. विजयालक्ष्मी सुनिल महाजन

आमचे सहकारी श्री. सुनिल सिताराम महाजन व नगरसेविका सौ. विजयालक्ष्मी सुनिल महाजन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**देवकृपा नॉटिंग व वहीफणी कॅम्प, इचलकरंजी**

**बाळु कवडे ▪ शुभम कवडे ▪ किरण कवडे**



शहापूरचे कणखर नेतृत्व तसेच आमच्या कुटुंबाचे मार्गदर्शक आधारस्तंभ तमाम जनतेचे विश्वासाचे प्रतीक....




कै. कृष्णा गुंडू नेमिष्टे चॅरिटेबल ट्रस्ट (रजि.) विघ्नेश्वर गणेश मंदीर, सावित्रीनगर, शहापूर.



### वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!





मा.श्री. उदयसिंग मारूती पाटील
विरोधी पक्ष नेते इचलकरंजी महानगरपालिका

मा.श्री. सुनिल सिताराम महाजन

सौ.विजयालक्ष्मी सुनिल महाजन (दीदी)



आमचे मार्गदर्शक, **मा.श्री. उदयसिंग मारूती पाटील, मा.श्री. सुनिल सिताराम महाजन, सौ. विजयालक्ष्मी सुनिल महाजन** (दीदी) यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

**• अरमान मोमीन •**

**अमायरा ट्रेडर्स स्क्रॅप मर्चंट, इचलकरंजी**





### हार्दिक शुभेच्छा!

आमचे सहकारी व माजी उपनगराध्यक्ष
**मा.श्री. सुनिल सितारामजी महाजन**
यांना वाढदिवसाच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!

मा.श्री. सुनिल सितारामजी महाजन

**दीपक ढेरे** - माजी सभापती, आरोग्य समिती इ.न.पा.
विजय मुतालिक । युवराज भोसले । संदिप पाटील

**राजे ग्रुप, संग्राम चौक, इचलकरंजी.**



## वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा!



आमचे मार्गदर्शक,
हितचिंतक व
इचलकरंजी नगरपालिकेचे
माजी उपनगराध्यक्ष
**मा. श्री. सुनिल सिताराम महाजन** व
इचलकरंजी महानगरपालिकेचे
विरोधी पक्षनेते
**मा. श्री. उदयसिंग मारुती पाटील**
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!



**मा. श्री. सुनिल सिताराम महाजन** | **मा. श्री. उदयसिंग मारुती पाटील**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सतिश डाळ्या | रविंद्र माने | तानाजी पोवार | उदय बुगड | रवी रजपुते |
| विठ्ठल चोपडे | जहाँगीर पटेकरी | मंगेश कांबुरे | सचिन हुक्कीरे | मच्छिंद्र नगारे |
| अमोल कोकणे | शैलेश सातपुते | | | |

## पहिल्या पंधरा शब्दास ७५ रू, पुढील प्रत्येक शब्दास ७ रू, शब्द मर्यादा ५० पर्यंत

### * खरेदी विक्री *

**जागा विकणे** २,३,५ गुंठे जागा शहापूर व धान्य गल्ली, इचलकरंजी. भेटा-मुकुंद जाधव, शितल कार ड्रायव्हिंग स्कूल, शिवाजीनगर पोस्टजवळ.

**बीम विकणे** आहेत. Picanol 190 १९० आणि Toyota कंपनीचे बीम विकणे आहेत. इच्छुक खरेदीदारांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा मो. ७७२००१८४०६.

**विकत पाहिजे** ३०/४० फूटी रोडटच ३ बीएचके स्वतंत्र बंगला, सुशिक्षित कॉलनीमध्ये विकत पाहिजे. मो. ९०११९११६११.

**कुर्ता पायजमा** धोतीकुर्ता सेट, थ्रीपेस सेट, किड्स मेन्स, फुल्ल व्हरायटी होलसेल दरात. शांती गारमेंट, गुरू चित्रमंदिर जवळ, इचलकरंजी. मो. ७०२०१५५७६६.

**६ लाख गुंठ्याने** तहसिलदार एनए प्लॉट १४.०० स्क्रे. फूट २ प्लॉट विकणे आहे. तारदाळ (लोनची सुविधा उपलब्ध) संपर्क- ९५२९१११२१४

**जुने सोफासेट** रिपेअरी करून देऊ. नवीन सोफा, पडदे व गादी ऑर्डरीप्रमाणे तयार करून देऊ. संपर्क-८२६१०८९५९०

**विकणे आहे.** २६.६३ गुंठे जागा १२००० शेड बांधकाम लाईट बोअर ६० फूट व ३० फुटी रोडटच शेड विकणे आहे. संपर्क- ९४२२६२२६०८

**४८ इंची माग** चालू स्थितीत विकणे आहे. संपर्क-९४२३८८२२२२

**मोक्याच्या ठिकाणी** घर विकणे आहे. भर चौकात ८१० चौ. फूट जागा, आपटे वाचन मंदिरलगत, राजवाडा चौक, इचलकरंजी व्यवसायासाठी व राहण्यासाठी उत्तम लोकेशन, चांगला दर अपेक्षित, एजंट क्षमस्व. ७९७२६७७३४७

**२ बीएचके फ्लॅट** रेडी पझेशन विक्रीसाठी उपलब्ध. २४ तास पाणी, लिफ्ट कर्जाची सोय. स्वामी समर्थ प्लाझा, जवाहरनगर, इचलकरंजी. ९८९०११६१६१

**आपल्या घरी येऊन** सोफा क्लिनिंग (शाम्पोईंग) करून देऊ. संपर्क-८९७५९७४१०७, ८६००४३५१३२

**पंडीत सुतार** ५६'' माग १२ विकणे आहे. जवाहर नगर, इचलकरंजी. मो. ७३८७४७१२१९, ९८९०४८७२००.

**आरजेके कंपनीचे** ६० ड्रमचे वायडिंग मशिन विकणे आहे. माफक दरात दिले जाईल. मो. ९०९६३८२७६५, ९३५९४६१६८४.

**माणकापूरात एनए** डिजीटल प्लॉट विकण आहे. कर्जाची सोय. मो. ९३७०५८१००८, ९८९०९७२१७८.

**जुने व नवीन** पॉवरलूम घेवू व देवू तसेच फवारा, कांडी मशिन, डक्टींग व रिकामे बिमे देवू व घेवू. मो. ८३१७२९१००८.

**फार्म हाऊस** विकणे आहे. जागा साडे दहा गुंठा, पूर्ण डेव्हलप- २ बीएचके, स्विमिंग पूल, लॉन गार्डन, पत्ता- राजमाने हायस्कूलमागे, रूई, मो. ९८६०४०५७०४, ९९६०६०७८६८.

**नवीन झेरॉक्स** मशिन कलर प्रिंटर, कॉम्प्युटर, लॅमीनेशन, स्टेशनरी, कपाट, कौंटरसहीत पूर्ण सेटअप विकणे आहे. १२ बाय १३ दुकानगाळा भाड्याने देणे. संपर्क- ९८८१०७०८६६.

### * यात्रा सहल *

**देवा हॉलिडेज** दुबई, थायलंड, व्हिएतनाम, सिंगापूर, मलेशिया, इंडोनेशिया १५ डिसेंबर, बँकॉक-पटाया, प्रतिव्यक्ती २२७००/-, पर्सनल ग्रुप बुकींग, किमान चार व्यक्ती, तुमची पसंती, तुमचं बजेट, तुमची तारीख. मो. ९१५६१३५६२४.

### वाचकांसाठी निवेदन

**दै.महासत्ता** वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द होणाऱ्या खरेदी-विक्री, नोकरीविषयक, भाड्याने देणे-घेणे, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय, आरोग्य विषयक व इतर सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहीरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. प्रत्येक जाहीरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत **दै.महासत्ता** व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही. याची वाचकांनी नोंद घ्यावी. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पुर्ततेसंदर्भात कोणतीही जबाबदारी **दै.महासत्ता** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक अथवा मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया नोंद घ्यावी. **व्यवस्थापक**

### * नोकरी विषयक *

**पिटर इंग्लंड** रेडीमेड शोरूममध्ये खास दिवाळीकरीता तात्पुरती/कायम स्वरूपात काम करणेसाठी मुले/मुली पाहिजेत.भेटा- व्यंकटराव हायस्कूल रोड, युनियन बँकेसमोर, इचलकरंजी.

**पेट्रोल पंपावर** (ग्राहक सेवा) पेट्रोल सोडणेसाठी कामगार पाहिजे. संपर्क- ९८२२२४९०२७, ८२०८३३८५५३

**होलसेल किराणा** दुकानात बिलिंगसाठी अनुभवी व हुशार व्यक्ती पाहिजे. संपर्क- संस्कार ट्रेडर्स, डेक्कन चौक, ९८६०२७१७५१.

**शुध्द शाकाहारी** हॉटेलमध्ये भांडी कामासाठी लेडीज पाहिजे. मो ९८८१४७५०१८.

**ऑफिस असिस्टंट** पाहिजे. फिजोओथेरपी सेंटरमध्ये, ऑफिस कामासाठी. शिक्षण-बारावी. कॉम्प्युटर, टॅलीची माहिती असावी. ७ दिवसात अर्ज करावेत. संपर्क- रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी. सेंट्रल, नाकोडा नगर, निरामय हॉस्पिटल रोड, इचलकरंजी. मो. ८३९०७०१७००.

**त्वरीत सिक्युरिटी** गार्ड भरती करणे. इचलकरंजी, प्राईड इंडिया, खंजिरे व पार्वती व कोंडीग्रे, आकर्षक पगार. १२ तास. संपर्क- ८०५५६६७७६६.

**मोफत कॉम्प्युटर** प्रशिक्षण योजने अंतर्गत ५० बॅचेसना प्रवेश सुरू. १००% नोकरी व व्यवसायभिमुख प्रशिक्षण. Graphic Design, Tally Prime, Advance Excel, Ms-Office कोर्सेसना प्रशिक्षण. नाममात्र नोंदणी फी. युनिव्हर्स कॉम्प्युटर.पत्ता- इचलकरंजी बस स्टॅण्डजवळ, बँक ऑफ महाराष्ट्र समोर, इचलकरंजी. मो. ९२८४२६४९८०.

**पाहिजेत पार्वती** इंडस्ट्रीजमधील नामांकित कंपनीमध्ये अनुभवी व्यक्ती पाहिजेत. १) सायझिंग दिवाणजी (जॉब वर्क आणण्यासाठी) २) खरड दिवाणजी ३) बॉयलर अंटेडंट. अनुभवी व्यक्तींनी खालील नंबरवर संपर्क साधावा. मो. ७७२००१८४०६.

**एरा कॅफे** ॲण्ड रेस्ट्रोमध्ये दु. ४ ते रा. ११ च्या बॅचसाठी (शेफ) मुले पाहिजेत. आकर्षक पगार दिला जाईल. मो. ७९७२६०६८३७, ९८६०६०३४५९.

**रिसॉर्टमध्ये रूम** आणि देखभालीसाठी जोडपे पाहिजे. राहण्याची सोय आहे. मो. ७०२०१९८१८५.

**चष्मा दुकानात** कामाचा अनुभव असलेला स्टाफ मुलगा पाहिजे. कामाची वेळ- सकाळी ९.३० ते रात्री ९ पर्यंत. मो. ८२३७५६७८९०.

**नोकरीची संधी** अकौंटट कम ॲडमीन पदासाठी महिला/पुरूष उमेदवारांची आवश्यकता आहे. पत्ता- ७/१८३, कापड मार्केट, गेट नं. ४, इचलकरंजी. मो. ९३७०२९३२३८.

**सिक्युरिटी गार्डस्** पाहिजेत. इचलकरंजी शहराकरीता ड्युटी ८ व १२ तास, पगार, १०००० व १५०००, वय २५ ते ५०, मो. ९०२१५५६१००.

**सेल्समन पाहिजे** कापड/शुज शोरूममध्ये सेल्समन पाहिजे. संपर्क- रेडटेप, सेंचुरी प्लाझा, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९०४९२७५५५४.

**कापड दुकानात** कामासाठी जेन्टस्/लेडीज पाहिजे. संपर्क- धनलक्ष्मी कॉटन मिल्स, कापड मार्केटसमोर, इचलकरंजी.

**निर्व्यसनी वॉचमन** पाहिजे. दिवस पाळीसाठी, धनलक्ष्मी कॉटन मिल्स, कापड मार्केटसमोर, इचलकरंजी.

**सीएनसी/व्हीएमसी/एचएमसी** अनुभवी व फ्रेश ऑपरेटर पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. स्वस्तिक ग्रुप, इंडस्ट्रीयल इस्टेट, यड्राव, मो. ८६६८६१०८६०.

**नामांकित अनुभवी** हॉटेल हवेली येथे. शेफ/हेल्पर/वेटर पाहिजे आहेत. कोल्हापूर रोड, कबनूर, इचलकरंजी. मो. ९९७५८५०८४९.

**हॉटेल/बारसाठी** मॅनेजर, वेटर व कुक पाहिजे. शिकाऊ/अनुभवी. संपर्क- ७२७६०९९५४५, कुंभोज.

**नामवंत शिक्षण** संस्थेत त्वरीत खालील जागा भरणे. टेलिकॉलर-३, ऑफीस बॉय-१, कौन्सलर-६, सर्व्हेसाठी महिला-६, मो. ९९२२३१४३०९ (फ्रेश व अनुभवींना प्राधान्य)

**साफसफाईसाठी माणूस** पाहिजे. मो. ९१३५७६६३५५, इचलकरंजी.

**वॉचमन पाहिजे** खंजिरे इंडस्ट्रीज, शहापूर येथे. संपर्क ९९६०६६५०६७.

**कामगार पाहिजेत** हार, बुकेच्या दुकानात मुलगी/मुलगा पाहिजे. मो. ९१२०९१७१७७, ८८८८२३१७३५.

**नामांकित क्रिकेट** टर्फसाठी फुलटाईम मॅनेजर पाहिजे. आकर्षक पगार, मो. ९९७०११२३४६.

**गारमेंट युनिटसाठी** अनुभवी टीम व सुपरवायझर/मास्टर पाहिजे. आकर्षक पगार. मो. ९४०५५१२३४६.

**नवीन एअरजेट** लुम युनिटसाठी मास्टर, बिमगेटर, विव्हर टीम पाहिजे. तसेच अनुभवी मॅनेजर/दिवाणजी पाहिजे. मो. ९४२२४१२३४६.

**वर्कशॉपमध्ये वेल्डर** व हेल्पर पाहिजेत. आकर्षक पगार. मो. ९९७०११२३४६.

**पाण्याच्या टँकरवर** ड्रायव्हर पाहिजे. मो. ८७८८७०७६८६, ८८६२०२४३९९.

**बेकरी शॉपीमध्ये** कामासाठी मुले पाहिजेत. संपर्क- बालाजी बेकरी, एएससी कॉलेज जवळ, मो. ९९६००२८२८९, ७२७६१२७१११.

**साफसफाईसाठी** ऑफीस बॉय पाहिजे. बिल्डींग नं. १०, गाळा नं. २७६, कापड मार्केट, इचलकरंजी.

**अनब्रेकेबल प्लॅस्टिक** मटेरियल स्टॉल लावून विक्रीसाठी टाटा सुमो व तीन चाकी मिनीडोअर टेम्पो चालवता येणारा सेल्समन पाहिजे. आभार फाटा, चंदूर. मो. ९८९०००९४८६.

**कामगार पाहिजे** बाफना हॉस्पिटल, जवाहर नगर येथे पार्ट टाईम/फुलटाईम कामासाठी स्टाफ पाहिजे. मो. ९५४५४३५३२७, इचलकरंजी.

**तातडीने भरती** १) सेल्स एक्झीक्युटीव्ह-इचलकरंजी परिसरात एफएमसीजी क्षेत्रात कामाचा अनुभव अनिवार्य (वय २० ते ३० वर्ष) २) डिस्पॅच मॅनेजर- डिस्पॅच किंवा संबंधित कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव आवश्यक. आकर्षक वेतन आणि इन्सेटीव्ह दिले जाईल. (वय २० ते ३० वर्षे), इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ९७६६२२२२८८.

**Following Proffessionals** are urgents required at Ichalkaranji. 1) Sales Officer-02 (DME or degree) 2) Design Engineer-02 (Auto CAD) 3) Welder&Helper-04, 02 to 05, aaaaa relevcent experience is must, Contact- tushar@svtrendz.com .m- 7767000017.

**डे/नाईट कामासाठी** आयाबाई पाहिजे.संपर्क-आई मॅटर्निटी होम, सांगली रोड, इचलकरंजी. मो. ९०२८२३५७०५.

**हॉटेल लॉजिंगसाठी** रूमबॉय मॅनेजर पाहिजे.रहाणेची +जेवणाची सोय. संपर्क-९८२२०५६५०१

**घरोघरी जाऊन** कंफर्ट ची माहिती/सर्व्हे करण्यासाठी लेडीज पाहिजे. पेमेंट फिक्स ४००+इन्सेटिव्ह २००, ५ तास काम. संपर्क-८८५५०६१०९६, ९१६८०५९६९४

**सांगली नाक्याजवळ** कंपनीमध्ये शिलाई पॅकिंग व फिनिशिंग कामासाठी महिला कामगार पाहिजे. सुपरवायझर पदासाठी मुलगी पाहिजे. संपर्क-७८२२०१८७४२, ८८८८६१५५५९

**कामगार पाहिजेत.** लेडीज कापड दुकानात फूलटाईम जेंटस किंवा लेडीज. इचलकरंजी स्टँडजवळ. ९९६०३३४००६, आकर्षक पगार.

**मावशी पाहिजे.** घरकाम करण्यासाठी अर्जंट मावशी हव्या आहेत. (गावभागातल्यांना प्राधान्य) वेळ-सकाळी ९ ते १, दुपारी ४.३० ते ८.३०. पत्ता-श्रीपाद नगर, चांदणी चौक, इचलकरंजी. मो. ९०४९०४२३७५

**मेडिकलमध्ये कामासाठी** मुलगा किंवा मुलगी फार्मासिस्ट किंवा नॉन फार्मासिस्ट पाहिजे. संपर्क- ९०११५७७५१५

**हॉटेलमध्ये फॅमिलीमध्ये** अनुभवी वेटर पाहिजे. भांडीसाठी महिला कामगार पाहिजे. सांगली रोड. ९५९५६०४७४७

**पार्टटाईमसाठी** कामगार पाहिजे. टेबल सर्व्हीस कामाची वेळ- संध्याकाळी ६ ते ११. संपर्क- ७३९७८११५२२, ९८८१९८२२९५

**वस्त्रोद्योग क्षेत्रासाठी** डेटा एंट्री ऑपरेटरची आवश्यकता आहे. ईमेल, सॉफ्टवेअर असणे वेबसाईट हाताळणी ज्ञान असणे आवश्यक. संपर्क-७३०४०७७२०८

**कपड्याच्या शोरूममध्ये** अनुभवी सेल्समन पाहिजे. कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक. संपर्क-सांगली रोड, गार्डन हॉटेलसमोर, इचलकरंजी. फोन-९६३७२२३३५३

**पाहिजेत.** बेकरी मशिन मेंटनन्स करीता-२, आयटीआय इलेक्ट्रीशियन, फिटर अनुभवी स्टोअर डिपार्टमेंट डाटा एन्ट्रीकरीता-२ टॅली आवश्यक, अनुभवी. फोन-९७६६२५६६५५

**सई चायनिजमध्ये कुक पाहिजे.** संपर्क-सचिन खाडे- ७८४१०६१२८७, ९३२५७३७३३७

**लेडीज स्टाफ पाहिजे.** मगदूम आयुर्वेदिक क्लिनिक, गांधी पुतळा, इचलकरंजी. संपर्क- ७३८५११२०३९

**एअरजेट कारखान्यात** हुशार व अनुभवी दिवाणजी पाहिजे. संपर्क- ८८०५२४२६७८

**हॉटेलसाठी** कामगार पाहिजेत. वेटर कामगार पत्ता- विक्रमनगर, बालाजी चौक, इचलकरंजी. फोन-९०९६२१७८०८, ८४८४०४२२००

**दूध सप्लायर पाहिजेत.** आमच्या फर्मसाठी लागणारे दूध पुरवठा करणारा हवा. संपर्क-ललीत माळी-९८९०२५७००१, इचलकरंजी.

**प्युअर व्हेज हॉटेलमध्ये** टेबल हेल्पर, वेटर किचन हेल्पर व वॉचमन कामासाठी स्टाफ पाहिजे. पार्टटाईम/फूलटाईम रहाणे+जेवणची सोय. संपर्क- ७८८७५५१३२९

**इंग्रजी माध्यमासाठी** शिक्षक/शिक्षिका अनुभवी/शिकाऊ पाहिजेत. संपर्क-८६८६१३७१७१, ८६५५१३७१७१

**रिटेल मेडिकल शॉपमध्ये** डे/नाईट, फार्मासिस्ट/सेल्समन/सेल्सगर्ल नेमणे आहे. समक्ष भेटा. न्यू ग्रीन मेडिको, झेंडा चौक, इचलकरंजी. फोन-९८२२१८६८६९, ८५३००४०४६७

**शिपाई नेमणे आहे.** आमच्या पतसंस्थेत शिपाई जागा भरणेची आहे. पात्रता-१०/१२ वी तरी इच्छुकांनी स्वहस्ताक्षरातील अर्जासह पतसंस्थेमध्ये बुधवार दि. २८/१०/२०२६ अखेर समक्ष येऊन भेटावे. पत्ता-विश्वमित्र नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, विक्रमनगर, शहापूर रोड, इचलकरंजी. मो. ९९२३६९४०४९

**१० वी पास**-नापास मुले पहिजेत. गरजूंनी भेटावे. संपर्क- ८३०८००११६१.

**लेडीज पाहिजेत** ऑफिस कामासाठी टेलीफोन ऑपरेटर व कॉम्प्युटर ऑपरेटर, संपर्क- ९६०४०००८४५.

**दुकानांचे बोर्ड** फिटींग करण्याकरीता वेल्डर व हेल्पर पाहिजे. विक्रमनगर, संपर्क- ९७६३६०११७७.

**ड्रायव्हर पाहिजे** मराठे बंगलो, लक्ष्मी प्रोसेसजवळ, इचलकरंजी. मो. ८९९९७५१५६६.

**पारले बिस्कीट** एजन्सीमध्ये मालाची ऑर्डर घेणेसाठी सेल्समन पाहिजे. संपर्क- ९६०४२६६०२१, इचलकरंजी.

**नामांकित ॲडव्हर्टायझिंग** कंपनीमध्ये अनुभवी लेडीज कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजेत. फोटोशॉपचे ज्ञान असल्यास प्राधान्य. मो. ८६५७१८१८१९, ८७८८४२००३३.

**कॉम्प्युटर सेल्स/सर्व्हिस** ऑफिसमध्ये सेल्ससाठी मुली पाहिजेत. कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक, प्रमोद इन्फोटेक, इचलकरंजी. मो. ९७६७४९६९२२.

**कमिशन बेसवर** दूध घरपोच करण्यासाठी मुले पाहिजेत. मो. ९९७०१५१४२४, ९९६०६२१४२४.

**सलगर चहासाठी** व नाष्टा सेंटरसाठी महिला व पुरूष कामगार पाहिजेत. नदीवेस नाका, पेट्रोल पंपाशेजारी, मो. ९४२२०४४९०९.

**मोटके डेअरी** फार्म जांभळी येथे दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी सेल्समन नेमणे आहे. फोर व्हिलर येणे आवश्यक. मो. ९८२२२९९९४८.

**हॉटेलसाठी वेटर** पाहिजेत. हॉटेल पाटीलवाडा, कबनूर. मो. ८४८३९६६५९३.

**मोठ्या कपड्यांच्या** उद्योग समुहात नोकरीची संधी. रिटेल शोरूम- जेन्टस्-५, लेडीज-४, गारमेंट सुपरवायझर (अनुभवी) जेन्टस् २, लेडीज १, गारमेंट मॅनेजमेंट- लेडीज १, रिटेल पगार- रूपये ८,००० ते रूपये १८,०००, वेळ - सकाळी १०-६ किंवा दुपारी ३-१०, स्थळ-इचलकरंजी. फुल टाईम व पार्ट टाईम, पगार व वेळेत लवचिकता, मो. ९९२१३८९५६७, ७०५७०५३५०५.

**पेट्रोल पंपावर** कामगार पाहिजेत. नदीवेस नाका, इचलकरंजी. मो. ९३५६६७०७४६.

बॉलिवूड अभिनेता टायगर श्रॉफवर झालेल्या गोळीबारामुळे चित्रपटसृष्टीत एकच खळबळ माजली आहे. काल १८ ऑक्टोबर रोजी अभिनेत्यावर मुंबईतील जुहू येथे हल्लाकरण्यात आला या हल्ल्यात अभिनेता जखमी झाला आहे. हल्लाच्या घटनेनंतर, र, लॉरेन्स बिश्नोई टोळीने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणारी एक ऑडिओ क्लिप प्रसिद्ध केली आहे. या ऑडिओमध्ये सलमान खानसोबत काम करणाऱ्या कोणालाही ठार मारण्याची स्पष्ट धमकी देण्यात आली आहे. बिश्नोई टोळीने यापूर्वीही सलमान खानच्या अनेक जवळच्या सहकाऱ्यांना लक्ष्य केले आहे. सलमान खान सोबत सध्या कोणते कलाकार काम करत आहेत आणि कोणाला धोका निर्माण होऊ शकतो असा प्रश्न सर्वांना पडला आहे. या कथित धमकीच्या पार्श्वभूमीवर सलमान खानसोबत आगामी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या कलाकारांविषयी चर्चा सुरू झाली आहे. सलमान सध्या 'मातृभूमी' या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात तो अभिनेत्री चित्रांगदा सिंहसोबत दिसणार आहे. चित्रपटातील दोघांची ऑनस्क्रीन केमिस्ट्री कशी असेल, याबाबत चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. अपूर्व लाखिया या चित्रपटाचं दिग्दर्शन करत आहेत. या चित्रपटाचं मूळ नाव 'बॅटल ऑफ गलवान' होतं, मात्र नंतर त्याचं नाव बदलून 'मातृभूमी' ठेवण्यात आल्याचं वृत्त आहे. चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख आणि नियोजित वेळापत्रक याबाबत अधिकृत माहिती तपासणं आवश्यक आहे.सलमान खानच्या आणखी एका आगामी चित्रपटाची चर्चा सुरू आहे. या चित्रपटाचं नाव 'मॉन्स्टर' असल्याचं सांगितलं जात असलं, तरी निर्मात्यांकडून अधिकृत घोषणेची प्रतीक्षा आहे. या चित्रपटात दाक्षिणात्य अभिनेत्री नयनतारा मुख्य भूमिकेत दिसणार असल्याचं वृत्त आहे. वामशी पैडीपल्ली या चित्रपटाचं दिग्दर्शन करत असल्याचीही माहिती समोर आली आहे.ए. पी. ढिल्लन, कपिल शर्मा, रोहित शेट्टी आणि गुरू रंधावा यांसारख्या मनोरंजन क्षेत्रातील व्यक्तींशी संबंधित ठिकाणी यापूर्वी हल्ले किंवा धमक्यांच्या बातम्या समोर आल्या आहेत.बिश्नोई गँगने प्रत्येक हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असून, एका निवेदनात स्पष्टपणे म्हटले आहे की, सलमान खानसोबत काम करणाऱ्यांवर असे हल्ले सुरूच राहतील. आता या यादीत टायगर श्रॉफचाही समावेश झाला आहे. या खळबळजनक हल्ल्या मुळे बॉलिवूड कलाकारांच्या सुरक्षेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे.



# रामायणमध्ये सीतेच्या भूमिकेसाठी साई पल्लवीच का?

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूर सध्या त्याच्या रामायण चित्रपटासाठी चर्चेत आहे.नितेश तिवारी दिग्दर्शित या चित्रपटात रणबीर कपूर प्रभू श्रीराम, तर साई पल्लवी माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. यश या चित्रपटात रावणाची भूमिका साकारत असून, त्याने नुकत्याच झालेल्या एका तेलुगू प्री-रिलीज कार्यक्रमात साई पल्लवीचे भरभरून कौतुक केले. साई पल्लवी ही केवळ उत्तम अभिनेत्री नसून, ती मनापासून भक्ती करणारी व्यक्ती असल्याचे यशने सांगितले. त्यामुळेच माता सीतेची भूमिका साकारण्यासाठी तिच्यात आवश्यक असलेले गुण असल्याचे त्याने नमूद केले.



बंगळुरूमध्ये झालेल्या तेलुगू प्री-रिलीज कार्यक्रमादरम्यान यशने साई पल्लवीच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि तिच्या भक्तिभावाबद्दल भाष्य केले. तो म्हणाला की, साई पल्लवी ही अत्यंत समर्पित व्यक्ती आहे. जेव्हा जेव्हा तिला संधी मिळते, तेव्हा ती माता सीतेचे स्मरण करते. सेटवरही तिचा हा भक्तिभाव पाहायला मिळाला असल्याचे यशने सांगितले. यशच्या मते, साई पल्लवी देवावर मनापासून प्रेम करते आणि तिची श्रद्धाही तितकीच दृढ आहे. ती अनेकदा देवाविषयी बोलत असते. त्यामुळे ती माता सीतेची भूमिका साकारत असल्याचा आपल्याला विशेष आनंद असल्याचे यशने स्पष्ट केले.साई पल्लवीचे कौतुक करताना यशने तिच्या अभिनयगुणांसोबतच तिच्या स्वभावाचाही उल्लेख केला. माता सीतेची भूमिका साकारण्यासाठी तिच्यात आवश्यक असलेली प्रतिभा आणि गुण आहेत, असे त्याने म्हटले.

यश म्हणाला, ''ती खूप भक्तिभाव असलेली व्यक्ती आहे. तिचे देवावर प्रेम आहे आणि त्याच्यावर तिची श्रद्धा आहे. ती अनेकदा देवाविषयी बोलते. ती माता सीतेची भूमिका साकारत असल्याचा मला खूप आनंद आहे. तिच्यात ही प्रतिभा आहे. तिचे मन खूप चांगले आहे. देव तिला आशीर्वाद देवो. मी तुम्हा सर्वांना विनंती करतो की तिला तुमचे प्रेम आणि आशीर्वाद द्या.''यशच्या या वक्तव्यामुळे 'रामायण'मधील साई पल्लवीच्या भूमिकेबद्दलची उत्सुकता आणखी वाढली आहे. तिच्या अभिनयातून माता सीतेचे व्यक्तिमत्त्व ती कशा प्रकारे उभे करणार, हे पाहण्यासाठी चाहते उत्सुक आहेत.

# 'आता AI नेच मुलं जन्माला घाला!

बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन सध्या तिच्या परखड वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. सोशल मीडियावर सेलिब्रिटींना त्यांच्या शारीरिक दिसण्यावरून ट्रोल करण्याचे प्रकार वारंवार घडतात. विशेषतः प्रसूतीनंतर महिलांच्या वाढलेल्या वजनावरून त्यांना लक्ष्य केले जाते.



अशाच प्रकारच्या बॉडी शेमिंगविरोधात विद्या बालनने आवाज उठवला असून, ट्रोलर्सना सडेतोड उत्तर दिले आहे. तिच्या वक्तव्याची सध्या चर्चा होत आहे. अभिनेत्री कतरिना कैफला प्रसूतीनंतर वाढलेल्या वजनावरून ट्रोल करण्यात आल्याची चर्चा आहे. याआधी अभिनेत्री ऐश्वर्या राय बच्चनलाही रॅम्प वॉकनंतर तिच्या दिसण्यावरून टीकेचा सामना करावा लागला होता. सेलिब्रिटींच्या शरीरावरून त्यांच्यावर टीका करण्याच्या या प्रकारावर अनेक कलाकारांनी नाराजी व्यक्त केली आहे.याच पार्श्वभूमीवर विद्या बालनने ट्रोलर्सना सुनावले. इतरांच्या दिसण्यावरून त्यांची निंदा करणाऱ्या लोकांनी आधी स्वतःकडे पाहावे, असे ती म्हणाली. एखाद्याच्या शरीरावरून त्याची थट्टा करणे ही अत्यंत चुकीची गोष्ट असल्याचेही तिने स्पष्ट केले.ट्रोलर्सना उत्तर देताना विद्या बालन म्हणाली, ''ही अत्यंत घाणेरडी गोष्ट आहे. जे लोक इतरांची निंदा करतात, त्यांनी स्वतःकडे आरशात पाहावे. कुठेतरी हे लोक स्वतःवरच नाराज आहेत आणि त्यांच्यातच काहीतरी कमी आहे, म्हणूनच ते इतरांमध्ये दोष शोधत आहेत.''

पुढे तिने उपरोधिक शब्दांत ट्रोलर्सना सुनावले. ''दुसरी गोष्ट म्हणजे, मुलाला जन्म दिल्यानंतर स्त्रियांचे वजन वाढते. तुम्हाला या गोष्टीचा इतकाच त्रास होत असेल, तर सतत , AI,AI करता ना, मग AI कडूनच मुलं जन्माला घालून घ्या,'' अशा शब्दांत तिने आपला संताप व्यक्त केला.

प्रसूतीनंतर महिलांच्या शरीरात हार्मोन्सशी संबंधित अनेक बदल होतात. त्यामुळे त्यांच्या वजनात आणि शारीरिक दिसण्यातही बदल होऊ शकतात. या नैसर्गिक प्रक्रियेकडे समजुतीने पाहण्याची गरज असल्याचे विद्या बालनने आपल्या वक्तव्यातून अधोरेखित केले.

# रितेश देशमुखची साऊथमध्ये एन्ट्री

मराठी चित्रपटांसह बॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवल्यानंतर आता रितेश देशमुख तेलुगू चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे.

राम पोथिनेनीच्या आगामी 'RAPO२३' या सायकॉलॉजिकल ॲक्शन थ्रिलरमध्ये रितेश देशमुखची महत्त्वाची भूमिका असणार आहे. या चित्रपटात तो खलनायकाच्या भूमिकेत दिसणार असून, त्याच्या या नव्या भूमिकेबद्दल चाहत्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

चित्रपटाच्या निर्मात्यांनी रितेश देशमुखच्या सहभागाची अधिकृत घोषणा केली. यासोबतच सेटवरील ५३ सेकंदांचा पडद्यामागील व्हिडीओही शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये राम पोथिनेनी दिग्दर्शकाच्या खुर्चीत बसलेला दिसतो, तर रितेश सेटवर दाखल होताना आणि रामसोबत संवाद साधताना पाहायला मिळतो.



# धनुष-ममूटीच्या चाहत्यांसाठी खास भेट!

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेता धनुष आणि ज्येष्ठ अभिनेते ममूटी यांच्या आगामी 'ओम: चैप्टर १: उधिरम द ब्लड वुड' या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. या चित्रपटातील दुसरं गाणं 'वीझा वीरा' नुकतंच प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. संगीतकार साई अभ्यंकरने संगीतबद्ध केलेल्या या गाण्यात दमदार बीट्स आणि जोशपूर्ण संगीताचा अनुभव मिळणार आहे. याआधी गाण्याची थीम रिलीज झाल्यापासून पूर्ण गाण्याची उत्सुकता वाढली होती. आता हे गाणं प्रदर्शित झाल्याने चित्रपटाच्या संगीतप्रवासाला आणखी रंगत आली आहे.'वीझा वीरा' हे गाणं साई अभ्यंकरच्या खास संगीतशैलीत तयार करण्यात आलं आहे.



दमदार बीट्स, हाय-व्होल्टेज एनर्जी आणि आकर्षक संगीत यामुळे हे गाणं लक्ष वेधून घेत आहे. गाण्याच्या थीमला मिळालेल्या प्रतिसादानंतर पूर्ण गाणं कधी प्रदर्शित होणार, याची प्रेक्षकांना उत्सुकता होती. आता गाणं रिलीज झाल्यानंतर त्याची चर्चा आणखी वाढण्याची शक्यता आहे.दिग्दर्शक राजकुमार पेरियासामी यांनी चित्रपटाचं भव्य विश्व पडद्यावर साकारलं आहे. 'वीझा वीरा'मधील संगीत आणि त्याचा जोश चित्रपटाच्या सिनेमॅटिक अनुभवाची झलक दाखवतो.चित्रपटाच्या संगीतप्रवासाची सुरुवात धनुषच्या वाढदिवशी प्रदर्शित झालेल्या 'अलाका लूवा' या पहिल्या गाण्याने झाली होती. आकर्षक बीट्स आणि उत्साही संगीतामुळे या गाण्याला सोशल मीडियावर चांगला प्रतिसाद मिळाला. त्यानंतर 'वीझा वीरा'ची थीम रिलीज करण्यात आली आणि पूर्ण गाण्याबद्दलची उत्सुकता वाढली.आता दुसऱ्या गाण्याच्या माध्यमातून निर्माते पुन्हा एकदा प्रेक्षकांना संगीताची वेगळी अनुभूती देण्याचा प्रयत्न करत आहेत.वीझा वीरा' गाण्याच्या प्रदर्शनाबद्दल आरटेक स्टुडिओजच्या संस्थापक आणि चित्रपटाच्या निर्मात्या श्रद्धा अग्रवाल यांनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, '''अलाका लूवा'ला प्रेक्षकांकडून मिळालेलं प्रेम आमच्यासाठी खूप उत्साहवर्धक होतं. लोकांनी केवळ हे गाणं पसंत केलं नाही, तर ते सतत ट्रेंडिंगमध्ये राहिलेलं पाहणं आमच्यासाठी खूप खास होतं. आणि आता संपूर्ण गाणं त्यांच्या भेटीला आणताना आम्हाला खूप आनंद होत आहे. साईने एक अतिशय भन्नाट आणि एक्सायटिंग गाणं तयार केलं आहे. प्रेक्षक या गाण्यावरही तितकंच, किंबहुना त्याहूनही जास्त प्रेम करतील, अशी आम्हाला आशा आहे.''

# नेपाळमध्ये आयुष्मान खुरानाच्या चित्रपटावर बंदी

बॉलिवूड अभिनेता आयुष्मान खुराना आणि अभिनेत्री सारा अली खान यांचा आगामी 'उडता तीर' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. मात्र, चित्रपटाच्या प्रदर्शनापूर्वीच त्याला मोठा धक्का बसला आहे. नेपाळमध्ये या चित्रपटाच्या प्रदर्शनाला परवानगी नाकारण्यात आली असून, त्याचे प्रदर्शन थांबवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.




भारत आणि पाकिस्तानमधील तणावाचे चित्रण हे या निर्णयामागील प्रमुख कारण असल्याचे वृत्त आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नेपाळच्या माहिती आणि संचार मंत्रालयाने चित्रपट वितरण कंपनी नॅशनल सिने ग्रुपला चित्रपटाच्या प्रदर्शनाला परवानगी नाकारल्याचे कळवले आहे. आकाश कौशिक दिग्दर्शित हा चित्रपट शुक्रवारी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार होता. मात्र, मंत्रालयाच्या ऑडिओ-व्हिडिओ आणि टेलिकास्ट शाखेने चित्रपटाची सामग्री निर्मिती, प्रदर्शन आणि वितरण कायदा, २०२६ मधील कलम ८(३) अंतर्गत प्रतिबंधित असल्याचे म्हटले आहे. या तरतुदीनुसार, संबंधित चित्रपटाला सार्वजनिक प्रदर्शनाची परवानगी देता येत नाही.

'उडता तीर' हा करण जोहरच्या प्रोडक्शन हाऊसच्या बॅनरखाली तयार झालेला स्पाय थ्रिलर चित्रपट आहे. या चित्रपटात आयुष्मान खुराना, सारा अली खान, गुलशन ग्रोव्हर आणि राम कपूर यांसारखे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये दिसणार आहेत.२३ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होत आहे.

चित्रपटाची कथा एका पाकिस्तानी एजंटभोवती फिरते. हा एजंट भारतात दाखल झाल्यानंतर एका अपघातात त्याची स्मरणशक्ती गमावतो. त्यानंतर त्याचा भारताशी जिव्हाळा निर्माण होतो आणि तो भारताच्या बाजूने उभा राहून पाकिस्तानमधील दहशतवादी आणि गुप्तहेरांना पकडण्याच्या मोहिमेत सहभागी होतो, अशी या चित्रपटाची कथावस्तू आहे.

समोर आलेल्या वृत्तांनुसार, चित्रपटात भारत आणि पाकिस्तानमधील तणावाचे विकृत चित्रण करण्यात आल्याचा आक्षेप घेण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर चित्रपटाच्या सार्वजनिक प्रदर्शनावर बंदी घालण्यात आल्याचे सांगितले जात आहे. नेपाळमध्ये एखाद्या देशाच्या किंवा तेथील समुदायाच्या राष्ट्रीयत्वावर थेट परिणाम करणाऱ्या चित्रपटांच्या प्रदर्शनावर निर्बंध घालण्याची तरतूद असल्याचेही वृत्त आहे.

दरम्यान, 'उडता तीर'च्या प्रदर्शनाबाबत नेपाळमध्ये घेतलेल्या या निर्णयामुळे चित्रपटाच्या चर्चेला नवे वळण मिळाले आहे. मात्र, या निर्णयासंदर्भातील अधिकृत स्पष्टीकरण आणि चित्रपटाच्या निर्मात्यांची प्रतिक्रिया याबाबतची माहिती समोर येणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# दीपिका आणि रणवीरने जाहीर केले दुसऱ्या मुलीचे नाव

गेल्या महिन्यात दीपिका पादुकोणने दुसऱ्या मुलीला जन्म दिला आणि तेव्हापासूनच तिच्या मुलीचे नाव काय असणार याची सर्वांना उत्सुकता होती. २० ऑक्टोबर २०२६ रोजी, दीपिका पदुकोणने सोशल मीडियावर एक कौटुंबिक फोटो शेअर करत आपल्या दुसऱ्या मुलीचे नाव 'देवी पदुकोण सिंग' असल्याचे जाहीर केले. या छायाचित्रात रणवीर सिंग आणि दीपिका आपली थोरली मुलगी 'दुआ पदुकोण' हिच्यासोबत दिसत आहेत, दीपिकाच्या मांडीवर दुआची धाकटी बहीण 'देवी' आहे.



दीपिका आणि रणवीर यांच्या दुसऱ्या मुलीचा, देवी पदुकोण सिंगचा जन्म १९ सप्टेंबर २०२६ रोजी झाला. आता दसऱ्याच्या निमित्ताने त्यांनी तिचे नाव सर्वांसमोर आणले आहे. या घोषणेमुळे चाहत्यांना त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची एक झलकही पाहायला मिळाली. यामुळे अनेक जण उत्सुक असल्याचेही दिसून आले आहे. दीपिका आणि रणवीर यांची पहिली मुलगी, दुआ पदुकोण सिंग, हिचा जन्म ८ सप्टेंबर २०२४ रोजी झाला होता. या जोडप्याने सोशल मीडियाद्वारे तिच्या जन्माची बातमी दिली होती आणि नंतर तिचे नावही चाहत्यांसोबत शेअर केले होते. आता देवीच्या आगमनानंतर, हे कलाकार दोन मुलींचे पालक बनले आहेत.दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंग यांच्या नात्याची सुरुवात २०१२ मध्ये झाली. संजय लीला भन्साळी यांच्या 'गोलियों की रासलीला राम-लीला' (२०१३) या चित्रपटात काम करताना ते एकमेकांच्या जवळ आले. पडद्यावरील त्यांची केमिस्ट्री जशी चर्चेचा विषय ठरली, तशीच पडद्याबाहेरील त्यांची मैत्रीही कालांतराने प्रेमात रूपांतरित झाली. रणवीरने नंतर सांगितले की, २०१५ मध्ये मालदीवमध्ये सुट्टीवर असताना त्याने दीपिकाला लग्नासाठी प्रपोज केले होते. या जोडप्याने तीन वर्षे आपली साखरपुड्याची बातमी गुप्त ठेवली आणि त्यानंतर २०१८ मध्ये लग्नाची घोषणा केली.

दीपिका आणि रणवीर १४ आणि १५ नोव्हेंबर २०१८ रोजी इटलीतील लेक कोमो येथे विवाहबंधनात अडकले. त्यांच्या लग्नाचे सोहळे दोन पद्धतींनी पार पडलेएक दीपिकाच्या कोकणी संस्कृतीनुसार आणि दुसरा रणवीरच्या सिंधी परंपरेनुसार. या जोडप्याने सोशल मीडियावर आपल्या लग्नाचे फोटो चाहत्यांसोबत शेअर केले, ज्यामुळे हा सोहळा त्या वर्षातील बॉलिवूडमधील सर्वाधिक चर्चेत राहिलेल्या सेलिब्रिटी लग्नांपैकी एक ठरला.



# राम गोपाल वर्मा पुन्हा अंडरवर्ल्डच्या विश्वात

'सत्या' आणि 'कंपनी' यांसारख्या चित्रपटांतून मुंबईतील अंडरवर्ल्डचे वास्तववादी चित्रण करणारे राम गोपाल वर्मा आता 'पोलीस कंपनी'च्या माध्यमातून पुन्हा एकदा याच विश्वाकडे वळले आहेत. या चित्रपटातून पोलिस यंत्रणेची भूमिका आणि गुन्हेगारी जगताशी असलेला संघर्ष पडद्यावर मांडला जाणार आहे.'पोलीस कंपनी' हा चित्रपट मुंबई पोलिसांच्या स्पेशल एन्काउंटर स्कॉडच्या कारवायांवर केंद्रित असणार आहे. १९९७ ते २००४ या काळात मुंबईत अंडरवर्ल्डचा मोठा प्रभाव होता. या कालावधीत मुंबई पोलिसांच्या स्पेशल एन्काउंटर स्कॉडने जवळपास ३०० अंडरवर्ल्ड गुंडांना ठार केले होते. या पार्श्वभूमीवर चित्रपटात गुन्हेगारी विश्व, पोलिसांची कारवाई आणि त्या काळातील परिस्थिती उलगडण्यात येणार आहे.या चित्रपटात हर्षवर्धन राणे माजी एन्काउंटर स्पेशालिस्ट दया नायक यांच्या भूमिकेत दिसणार आहेत. दया नायक यांच्या कारकिर्दीशी संबंधित घटनांमधून मुंबईतील अंडरवर्ल्ड आणि पोलिस यंत्रणेतील संघर्ष दाखवण्याचा प्रयत्न चित्रपटात केला जाणार आहे.'पोलीस कंपनी'मध्ये हर्षवर्धन राणे यांच्यासोबत फरदीन खान, फातिमा सना शेख, परेश रावल, सौरभ शुक्ला, मकरंद देशपांडे आणि अश्विनी काळसेकर हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत.





# चला कोजागिरी साजरी करूया...!

(पान४ वरून)

लक्ष्मीच्या स्वागतार्थ रात्री रस्ते, घरे, मंदिरे, उद्याने, घाट इ. ठिकाणी असंख्य दीप लावावेत.

सनत्कुमार संहितेत ह्या व्रताची अजून एक कथा दिली आहे. प्राचीन काळी याच दिवशी 'कौमुदी महोत्सव' साजरा करीत. 'कौमुदी पौर्णिमा' व 'शरद पौर्णिमा' अशीही नावे ह्या दिवसास आहेत.पावसाळ्यानंतर प्रसन्न अशा शरद ऋतूतील ही पौर्णिमा असल्यामुळेही तिला उत्सवाचे महत्त्व आले असावे. या दिवशी विधीपूर्वक स्नान करून उपवास ठेवायला पाहिजे. काही लोक तांब्याच्या किंवा मातीच्या कलश्यावर वस्त्राने झाकलेली सोन्याची लक्ष्मीची मूर्ती किंवा प्रतिमा स्थापित करून पूजा करतात. संध्याकाळी चंद्रोदय झाल्यावर सोने, चांदी किंवा मातीचे तुपाने



भरलेले दिवे लावतात. देवीला नैवेद्य दाखविला जातो. तूप घातलेली खीर तयार करून व बऱ्याच पात्रात भरून ती चंद्र किरणांखाली ठेवली जाते. तीन तासानंतर संपूर्ण खीर लक्ष्मीला अर्पित करून जेष्ठांना प्रसाद म्हणून वाढावी. त्याबरोबर मांगल्यमय गाणी म्हणून, भजने म्हणत रात्री जागरण करावे. सकाळी सुर्योदयावेळी स्नान करून लक्ष्मीची सुवर्णाची प्रतिमा आपल्या गुरूंना अर्पित करावी. अशीही काही ठिकाणी पद्धत, परंपरा आहे. शरद ऋतूमध्ये हवामानात बरेच बदल घडून येत असतात.. एकीकडे पावसाळा संपत असतो आणि दुसरीकडे हिवाळा सुरु होत असतो. दिवसा गरम आणि रात्री थंडी पडते. चंद्र प्रकाशातील दुधामुळे पित्त प्रकोप कमी होतो. याच कारणामुळे बहुतेक पौर्णिमेच्या रात्री मसाला दूध पिण्याची प्रधा आहे. कोजागरीचं शीतल चांदणं अंगावर घेतलं, की मनःशांती, मनःशक्ती, उत्तम आरोग्य लाभतं.

अशा या संपन्नतेमध्ये शरद पोर्णिमेला शबरीचा जन्म झाला. शबरी ही शबर राजाची कन्या होती. कोणी तिच्या वनवासी भिल्ल समाजाची असण्यावर भर देतात. कोणाला मातंग ऋषीं समोर अध्यात्मिक आस पूर्ण करण्यासाठी गुरू उपदेश घेणारी शबरी भावते. तर कोणाला आपल्या दैवताला जे आहे ते, प्रसंगी उष्टी बोरे देऊनही समर्पित होणारी शबरी आठवते. कोणाला सीतेच्या शोधार्थ निघालेल्या दशरथ नंदन राम लक्ष्मणांना मार्गदर्शन करणारी शबरी आठवते. किती विविध रूपे ! सगळीच अनुकरणीय आणि म्हणूनच आदर्शवत रूपे !!

# वाईट कर्म करण्यापूर्वी माणसाने हजार वेळा विचार करावा

**एकदा** कर्म केल्यावर त्याचे फळ आज नाही तर उद्या भोगलेच पाहिजे व त्यावेळी छाती पुढे करून माणसाने त्यास समोर जाण्याची तयारी ठेवली पाहिजे.म्हातारपणी एखाद्याला अर्धांग वायू होऊन या कुशीचे त्या कुशीस होता येत नाही. स्वच्छतेच्या अभावी अंगाला दुर्गंधी सुटते.अशा अंथरूणात पडलेल्या अवस्थेत भले तो वारंवार परमेश्वराला हाका मारून देवा सोडव या यातनातून तुझ्या पायाशी यावयास मी केव्हाही तयार आहे.असे वारंवार बोलून देवाची कितीही आळवणी करीत असाल तरीपण या जन्मी भोगण्याचे निर्धारीत प्रारब्ध जोवर पूर्ण होऊन संपत नाही,तोवर त्याने काहीही केले तरी त्याचा देह सुटत नाही. पण ज्या क्षणी ते पुरे होते,त्यानंतर मुलाने घातलेल्या गंगाजलाच्या एकही थेंब पोटात न जाता नाकावाटे बाहेर येतो व एकही ज्यादा श्वास न घेता त्या म्हाताऱ्याचा अंत होतो.त्याच्या संचित कर्माच्या पर्वतप्राय साठ्यातील काही कर्मे परिपक्व होऊन प्रारब्धकर्मात रूपांतरीत होऊन त्याला भोगण्यासाठी त्याची जणू वाटच पहात असतात. आणि ती भोगण्यासाठी अनुरूप असा नवा देह त्याला पुन: प्राप्त होतो. पुन्हा नवे आई, वडील,स्त्री,पुत्र, नातलग त्याला मिळतात.त्या जीवन काळात भोगण्याचे सर्व प्रारब्ध कर्मे भोगेपर्यंत तो जिवात्मा त्या नवीन देहात अडकतो.अशा रितीने तो जिवात्मा जन्म मरणाच्या चक्रात सतत फिरत असतो.अनादी कळापासून जन्म जन्मांतरीतील संचित कर्म भोगण्याचे हे चक्र अव्याहतपणे चालत आलेले असते.जोवर तो या चक्रातून सुटत नाही.तोवर त्याला मुक्ती




नाही.अशा प्रकारे अनेक योनीमध्ये जीव भटकत असतो.मनुष्य योनीत असता त्याने केलेल्या क्रियमान कर्मातील अनेक अपरिपक्व कर्मे संचित म्हणून जमा होत रहातात.तर त्यापैकी काही कालांतराने पक्व होऊन फळ देऊनच शांत होतात.पण एकंदरीत जीवाचा कर्मसाठा प्रत्येक जन्मात वाढतच राहतो.व या कारणास्तव जिवात्मा मोक्षापासून दूर दूर लोटला जातो.तुमचे कृत कर्मे तुम्ही जाल तेथे तुमचा पिच्छा सोडणार नाही.आणि तुम्हाला भोग देऊनच ते शांत होईल.कदाचित तुम्ही आपल्या द्रव्य बळावर या जगातील कोणी नामवंत वकील देऊन निर्दोष सुटका करून घेतलीत तरी वरील कोर्टात परमेश्वराच्या न्यायालयात तुम्ही कदापि सुटू शकत नाही.तेथे हुशार वकीलाचा युक्तीवाद तुमच्या मदतीला येऊ शकणार नाही. कर्माच्या कायद्यात वकिलाची चतुराई, जज्जाची बुध्दीमत्ता वा कोणी उच्च पदाधिकाऱ्याची मध्यस्थी यांना बिलकूल वाव नाही.पुण्याईचा जोर असल्याने संचित कर्मे पक्व होण्यास विलंब लागतो.त्यामुळे जगाच्या दृष्टीने तो दोषी असूनही काही काळ तो प्रतिष्ठीत म्हणून उजळ माथ्याने जगू शकतो.पण पुण्याईचा जोर ओसरताच त्याचे संचित कर्म फळ देण्यास समर्थ होते. व फळ देऊन आपला प्रभाव दाखवून शांत होते.म्हणून परमेश्वरावरील दृढ श्रध्दा व कर्म सिध्दांत तत्वावरील आपला विश्वास किंचितही ढळू न देता प्रत्येक मनुष्याने सांप्रत जरी त्याला दु:ख हाल-अपेष्टा भोगाव्या लागत असल्या तरी ना उमेद न होता,त्या सहन कराव्या व न्याय नितीच्या मार्गावरून न ढळता,अविरतपणे सत्कर्म करीत रहावे.

-राजेंद्र शामराव महमदापुरे
कुरुंदवाड
मो.९४२३०८४२३०

# कहत कबीर सुनो भाई साधो...

(पान४ वरून)

त्यांनी 'बीजक' ग्रंथाची विभागणी वेगवेगळ्या काव्यप्रकारांत केली कारण प्रत्येक भागाचा एक विशिष्ट उद्देश आहे. या ग्रंथातील रमैनी या प्रकारामध्ये कबिरांनी जगाची उत्पत्ती, अध्यात्म आणि माया यावर प्रकाश टाकला आहे. हे चौपाई छंदात लिहिले आहे. शब्द या प्रकारात संगीतमय पदे (गाणी) आहेत. यात बाह्य कर्मकांडांवर कडक टीका करत अंतरंगातील ईश्वराचा शोध घेण्याचा संदेश दिला आहे.साखी नावाचा या ग्रंथात अजून एक प्रकार आहे. साखी म्हणजे साक्षी. यामध्ये कबिरांचे जगप्रसिद्ध दोन ओळींचे दोहे आहेत. यात व्यावहारिक ज्ञान, नीतिमत्ता आणि गुरूचे महत्त्व सांगितले आहे. उदा.ऐसी बानी बोलिये,मन का आपा खोय औरन को शीतल करै,आपहु शीतल होय



माणसाने आपल्या मनातील अहंकार बाजूला ठेवून इतरांशी नेहमी अत्यंत नम्र आणि गोड भाषेत बोलले पाहिजे. अशा शब्दांमुळे ऐकणाऱ्या व्यक्तीचे मन शांत आणि आनंदी होतेच, पण तसे गोड बोलल्यामुळे बोलणाऱ्याच्या स्वतःच्या मनालाही एक वेगळाच संतोष आणि शीतलता लाभते.त्यांची अजुन एक साखी बघु या,बुरा जो देखन मैं चला,बुरा न मिलिया कोय जो दिल खोजा आपना,मुझसे बुरा न कोय कबीर म्हणतात की, मी आयुष्यभर इतरांमधील वाईट गोष्टी आणि दोष शोधत फिरत होतो; पण मला समाजात कोणीही पूर्णपणे वाईट माणूस सापडला नाही. मात्र, जेव्हा मी अंतर्मुख होऊन स्वतःच्या मनात डोकावले आणि स्वतःचे आत्मपरीक्षण केले, तेव्हा मला जाणीव झाली की, इतरांपेक्षा जास्त दोष आणि वाईट विचार तर माझ्याच मनात आहेत. म्हणजेच, इतरांवर बोट ठेवण्यापूर्वी माणसाने आधी स्वतःच्या चुका सुधारल्या पाहिजेत.संत कबिरांचे काव्यात असा विलक्षण पारदर्शीपणा होता. त्यांचे काव्य अतिशय मर्मग्राही दांभिकतेवर प्रहार करणारे होते. त्यांनी कर्मकांडाचा, अंधश्रद्धेचा कडाडून विरोध केला. त्यांची निर्गुण परमात्म्यावर श्रद्धा होती. कोरड्या पूजापाठापेक्षा नैतिक वागणूक त्यांना महत्त्वाची वाटे.हिंदू-मुस्लीम दोघांच्या दोषांवर त्यांनी टीका केली.काँकर पाथर जोरि कै,मसजिद लई बनाय ता चढ़ि मुल्ला बाँग दे,क्या बहरा हुआ खदाय खडे आणि दगड एकत्र करून मशीद तर बांधली, पण त्यावर चढून मुल्ला एवढ्या मोठ्याने बांग का देतो? देव काय बहिरा आहे का? तो तर मनातील हळू आवाजही ऐकू शकतो.जातीभेदाचाही त्यांनी निषेध केला.जाति पाति पूछे नहिं कोई हरि को भजै सो हरि का होई अर्थ: देवाला किंवा निसर्गाला माणसाची जात विचारण्यात रस नाही. जो चांगल्या भावनेने सत्याची सेवा करतो, तोच देवाचा होतो. माणूस हा जन्माने नाही, तर कर्माने श्रेष्ठ ठरतो. एकंदरीत संत कबीर ही अशी विभूती होती की ती सर्वांशीच आत्मीय भावाने निगडीत होती. कोणत्याही धर्म, पंथात बंदिस्त नव्हती. तर केवळ मानवाला जीवनाचे मूळतत्त्व समजावून सांगत नैतिकतेच्या पथावरून नेणारी होती. 'राम' या शब्दात जो हृदयाला मिळणारा आराम, शांती आणि असीम आनंद भरलेला आहे, तो सर्वांनी लुटावा, हेच त्यांचे जीवनध्येय होते.

# अंतःकरणात परमप्रकाशाचा अंश



**एका तळ्यात** होती बदके पिले सुरेख होते कुरूप वेडे पिल्लू तयात एक...'' दुरून येणारे आशा दीदींचे हे स्वर कानी आले आणि परवाचा एक प्रसंग सहजच डोळ्यांसमोर उभा राहिला. काही दिवसांपूर्वी आमच्याच ओळखीतील एक व्यक्ती, वय अगदी कोवळे जवळ जवळ तीस-पस्तीस. अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्याचे निधन झाले. तसा तो मुलगा दिसायला काळा-सावळाच खरंतर दुर्लक्षितच पण नेहमीच प्रत्येकाच्या मदतीकरिता धावणारा आणि जेव्हा जयमाला घालायची वेळ यायची तेव्हा मात्र दुसराच कुणीतरी बाजी मारून जायचा आणि अशातच सोसायटीत पूजेचा घाट घातला गेला आणि मग मात्र 'त्याची' तीव्रतेने आठवण आली. जेव्हा तो होता तेव्हा त्याला खिचगणतीतदेखील न घेणारे आज त्याची आठवण काढून काढून डोळे ओले करत होते.कसं आहे ना की, माणसाचं मन अनेकदा धुक्याच्या पडद्यामागे लपलेल्या सूर्यकिरणासारखं असतं. माणूस जिवंत असताना त्याचं तेज आपल्याला दिसत नाही, कारण आपण त्याचं अस्तित्व गृहीतच धरतो. जणू एखादं झाड रोज सावली देतं, फळं देतं, पण आपण त्याच्याकडे लक्षच देत नाही. मात्र ते झाड कोमेजलं की, त्याच्या सावलीची उणीव मनाला चटका लावते. तसंच, माणसाच्या आयुष्यातही होतं, जिवंत असताना त्याला कमी लेखणारे, दुर्लक्षित करणारे लोक, त्याच्या कायमच्या अनुपस्थितीत मात्र डोळे भरून त्याच्या आठवणी काढतात. आता असं पाहा की, एखाद्याच्या मृत्यूच्या वेळी देखील लोकांचा स्वभाव हा वाऱ्याच्या झुळुकीसारखा क्षणभंगुर असतो. अंत्यविधीच्या वेळीही लोक विचारतात, ''अजून किती वेळ आहे?'' किंवा ''अस्थी घरात न आणता बाहेर टांगून ठेवतात'' आणि मग काही विशिष्ट विधी पूर्ण झाल्यावर, जन पळभर म्हणतील हाय हाय'' या तालावर पुन्हा रोजच्या कामाला लागतात. हे दृश्य अगदी संध्याकाळच्या सूर्यास्तासारखं आहे. क्षणभर आकाश लालसर होतं, मनाला वेदना जाणवते, पण लगेचच अंधार पसरतो आणि लोक पुन्हा आपल्या धावपळीत गुंततात. मृत्यूच्या क्षणी वाहिलेली अश्रूंची नदी ही फक्त पश्चात्तापाची लाट असते पण जिवंत असताना दिलेला सन्मान हा आत्म्याला खऱ्या अर्थाने राजहंसासारखी भरारी घेण्याचं बळ देतो. बाह्य रूप कुरूप वाटलं तरी त्याच्यातील तेज हे परमप्रकाशाशी जोडलेलं असतं. जिवंत असताना दिलेला सन्मान हा आत्म्याला उंच भरारी घेण्याचं बळ देतो आणि तोच अध्यात्माचा खरा संदेश आहे. अध्यात्म सांगतं की शरीर हे मातीचं भांडं आहे, कधी माठ, कधी घट, कधी मडकं. पण आत्मा हा शाश्वत आहे, तो परमप्रकाशाचा अंश आहे. म्हणूनच संत म्हणतात, ''जिवंतपणीच सन्मानाने वागणूक द्या.'' कारण मृत्यूनंतर केलेले विधी ही फक्त परंपरा असते, पण जिवंत असताना दिलेलं प्रेम, आदर, आणि मान हीच खरी आत्मसाक्षात्काराची पूजा असते. म्हणूनच खरी शहाणपणाची ओळख म्हणजे, 'जिवंत असताना माणसाला मान देणे. जीवनात हेच सत्य आहे की, दिवसभर सूर्यकिरणांचा प्रकाश असतो, पण आपण त्याचं महत्त्व जाणत नाही. मात्र सूर्य अस्ताला जातो तेव्हा त्याच्या लालसर किरणांनी आकाश रंगून जातं आणि मनाला गूढ वेदना जाणवते. माणसाच्या जाण्याची वेदना ही अशाच अस्ताच्या क्षणासारखी असते. म्हणूनच खरी शहाणपणाची ओळख म्हणजे जिवंत असताना आत्म्याला मान देणे. माणूस अनेकदा फुलाच्या पाकळ्यांकडे पाहून त्याचा सुगंध विसरतो. बाह्य रूप हे डोळ्यांना भुरळ घालणारं असतं, पण त्यामागे दडलेलं सार हेच खरं मूल्य असतं. संतांनी म्हणूनच सांगितलं आहे की, ''ऊस डोंगा परि रस नव्हे डोंगा.'' ऊस जरी खडबडीत दिसला तरी त्याच्या आत गोड रस दडलेला असतो. तसंच, माणसाचं बाह्य रूप कुरूप वाटलं तरी त्याच्या अंतःकरणात परमप्रकाशाचा अंश दडलेला असतो. बाह्य रूपावरून माणसाचं मूल्य ठरवू नये, तर त्याच्या अंतःकरणातील तेज पाहावं. जसं आकाश ढगांनी झाकलं तरी त्याची निळाई कायम राहते, तसंच आत्म्याचं स्वरूप शुद्ध आणि अखंड असतं. आता इथे मला असं वाटत की, हे दृश्य अगदी संगीताच्या रागासारखं आहे. एखादा स्वर विसंगत वाटला तरी मूळ सुराशी जोडला की त्याचं माधुर्य फुलतंच, तसंच माणसाचं बाह्य रूप विसंगत वाटलं तरी त्याच्या आत्मस्वराशी जोडला की त्याचं खरं सौंदर्य उमलतं. म्हणूनच कायम अंतःकरणातील प्रकाश ओळखा. कारण खरी गोडी ही उसाच्या रसात आहे, खरी निळाई ही आकाशात आहे आणि खरं तेज हे आत्म्यात आहे. इथे एक गोष्ट प्रकर्षाने लक्ष्यात येते आणि ती म्हणजे जीवन हे स्वतःमध्येच एक अद्भुत देणगी आहे. विधात्याने प्रत्येकाला वेगळं रूप, बुद्धी, आणि शक्ती दिली आहे. जसं निसर्गात प्रत्येक ऋतूचं वेगळं सौंदर्य असतं, पावसात हिरवाई, उन्हाळ्यात तेज, हिवाळ्यात शांतता तसंच प्रत्येक माणसात त्याचं स्वतःचं तेज असतं. एखादं फूल लालसर, एखादं पांढरं, एखादं नाजूक, पण प्रत्येक फुलात सुगंधाचा अंश असतोच. तसंच, प्रत्येक जीवात परमप्रकाशाचा अंश दडलेला असतो पण, मानवी स्वभावात एक विचित्र प्रवृत्ती असते आणि ती म्हणजे सतत उणिवा दाखवणं. जणू एखाद्या आरशात फक्त डागच दिसावेत, पण त्यातलं तेज दिसू नये आणि अशाच सोबतींचा प्रभाव आत्मविश्वास खच्ची करतो. जसं वाऱ्याची झुळूक सतत ज्योतीला हलवत राहते, तसंच नकारात्मक शब्द आत्म्याच्या ज्योतीला डळमळीत करतात. माणूस मग स्वतःच्या तेजावर शंका घेतो आणि त्याचं आत्मभान धूसर होतं. पण इथेच खरी प्रेरणा महत्त्वाची ठरते. जसं जांबुवंतांनी हनुमानाला त्याचं सामर्थ्य आठवून दिलं, तसं योग्य वेळी मिळालेलं प्रोत्साहन आत्म्याला पुन्हा जागृत करतं. हनुमंत स्वतःचं सामर्थ्य विसरले होते, पण जांबुवंतांच्या शब्दांनी त्याच्या अंतःकरणात सुप्त असलेली शक्ती जागी झाली. हे दृश्य अगदी वाद्याच्या तारांवरून उमटणाऱ्या स्वरासारखं आहे योग्य स्पर्श झाला की विसंगत ताराही मधुर गाणं गाऊ लागतात.जीवनाची खरी देणगी म्हणजे विधात्याने दिलेलं रूप, बुद्धी, आणि शक्ती ओळखणं. सोबतींचा प्रभाव नकारात्मक असेल तर त्याला झटकून टाकणं आणि योग्य प्रेरणेने आत्मभान जागृत करणं हे गरजेचे आहे तरच आपल्या जीवनाच्या गोंदणवाटेची वाटचाल ही अधिकच रेखीव होईल आणि जीवनाच्या अखेरीस आपल्या आयुष्याच्या वाळलेल्या पानाच्या रेषांवर कर्माच्या फुलांची टिंबे ठळकपणे दिसून येतील आणि मग कपटफुलांच्या रानगंधात हरवलेल्या आपल्या आत्म्याला कर्माच्या काजळरेखेची जाणीव होऊन कांचनमृगी चोळीचे आकर्षण आपोआपचनाहीसे होईल. अखेरीस माझ्याच शब्दांत सांगायचे झाले तर... ''कपटफुलांच्या रानगंधात वैराण नूपुर वाजती... डंख देत शाप-उशापातील दग्ध अंतराळ जळती... पूर्ण-अपूर्णतेतील अंतर मिटविते सत्याची प्रीती... जीवन पूर्णाकृती उमलते आत्मप्रकाशाशी एकरूप होती...''

# काश्मिरी स्त्रीसंत लल्लेश्वरी

**एका** काश्मिरी पंडिताच्या पोटी, श्रीनगरजवळील सिमपूर येथे इ. स. १३२० मध्ये लल्लेश्वरी नामक एक स्त्रीसंतरूपी रत्न निपजले. लल्लेश्वरीला बालपणापासूनच भगवान शिवाची भक्ती करणे प्रिय होते. मात्र तिच्या मनावर वेदान्तातील अद्वैत सिद्धान्ताचा प्रभाव होता. काश्मीर हे संस्कृत भाषेतील प्रकांड विद्वानांचे शहर होते. अभिनव गुप्त, क्षेमेंद्र, उत्पल देव अशा काश्मीरच्या विद्वानांनी संस्कृत भाषेत महनीय साहित्य निर्माण केले आहे. संत लल्लेश्वरी यांनी मात्र काश्मीरच्या बोलीभाषेत आपल्या काव्याची रचना केली आहे. मात्र त्यांच्या काव्यातील तात्त्विक खोली अनन्यसाधारण आहे. हे काव्य प्रत्येकाच्या हृदयात हात घालते, त्याला अंतर्मुख करून आत्मोन्नतीचा मार्ग दाखवते.लल्लेश्वरीचा विवाह बाराव्या वर्षीच झाला. त्यांना कठोर सासुरवास भोगावा लागला. त्यातून तावूनसलाखून बाहेर पडलेल्या संत लल्लेश्वरीचे दर्शन आपण घेऊ या...

सकाळपासून अंगमहेनतीचे काम उपसून लल्ला आता अगदी थकून गेली होती. मध्यान्हाची वेळ झाल्याने पोटात भुकेचा आगडोंब उसळला होता. तितक्यात ''एवढा मोठा भाताचा ढिगरा लागतो तिला...!'' लल्लाची सासू कुणाशी तरी बोलत होती. हातात भाताने भरलेली थाळी घेऊन सासू लल्लाजवळ आली आणि थाळी ठेवून निघून गेली. लल्ला हात धुवून जेवायला बसली. कोरडाच भात असेना का, पण भुकेपुढे तो पाहूनही तिला आनंद झाला. पण जेवायला पुढे झालेला लल्लाचा हात एकदम थबकला. थाळीमध्ये एक मोठा दगड होता आणि त्यावर भाताचा फक्त पातळ थर होता...!लल्लाच्या डोळ्यांतून अश्रूधारा वाहू लागल्या. तेवढ्यात तिचा नवरा तेथे आला. त्याच्यापुढे लल्लाने थाळी धरली, त्याच्या सर्व लक्षात आले, तरीही तो म्हणाला 'आईने एवढे अन्न आणून दिले तरी अश्रू का गाळते?' लल्लाकडे एक तुच्छ कटाक्ष टाकून तोही निघून गेला...! आतापर्यंत सासरी होत असलेल्या तिच्या छळाची परमावधी झाली होती. लल्लाच्या डोळ्यांतल्या अश्रूंमध्ये भगवान शिवाची तेजस्वी मूर्ती चमकली आणि भारल्यागत ती घराच्या बाहेर पडली. आता लल्लाच्या मनात घरदार, आप्तस्वकीय, लोकलाज कशाचाही पाश नव्हता, तनामनाला झालेल्या वेदनाही तिला आता जाणवत नव्हत्या, लोकांनी भरलेले नगर तिच्यासमोर धुसर झाले होते. तिची पावले हिमगिरीकडे वेगात धावत होती. लल्लाने तिच्या लग्नाआधी ज्या सिद्ध श्रीकंठ नावाच्या शैव आचार्यांकडे शैवदर्शनाचे सखोल शिक्षण घेतले होते, तेच सिद्ध श्रीकंठ आता तिच्यापुढे ठाकले. '' लल्ला... लल्ला...'' म्हणून त्यांनी हाक मारली. पण त्यांच्या लक्षात आले, लल्लाला शिवमूर्तीशिवाय दुसरे काही दिसत नाहीय, ऐकू येत नाही. लौकिकाच्या मोहातून तिच्या मनाची पूर्ण सुटका झाल्याबद्दल त्यांची खात्री पटली. त्यामुळे त्यांनी तिच्या मस्तकावर आपला कृपाहस्त ठेवून तिला शास्त्रशुद्ध साधनेचा मार्ग दाखवला. लल्ला आता पूर्णसिद्ध योगिनी लल्लेश्वरी बनल्या होत्या. लोकांनीही त्यांचा पारमार्थिक अधिकार मान्य केला आत्मसाक्षात्कारानंतर त्यांचे काश्मिरी भाषेत उद्गार आहेत,दमादम करमस दमन हिल प्रजल्योम दीप ननेयम्? जात ।अन्दर्युम प्रकाश न्यवर छोटुम गिर रोटुम करमस थपमी मोठ्या प्रयत्नाने प्राणांवर विजय मिळविला. माझ्या हृदयातला आत्मदीप प्रज्वलित होऊन उठला. मला आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले. मी अंतरिक ज्योत बाहेर प्रकट केली आणि माझ्या प्रियतम भगवंताला मी बांधून ठेवले शिवाच्या भक्तिप्रेमाच्या उन्मनी अवस्थेत लल्लेश्वरींच्या मुखातून अनेक सुंदर पद्यरचना बाहेर पडू लागल्या. लोकांना त्या अतिशय श्रवणीय वाटल्याने त्यांच्या त्या



मुखोद्गतही झाल्या. काश्मीरमध्ये संत लल्लेश्वरींनी रचलेले कितीतरी काव्यचरण नीतिवाक्ये म्हणून प्रसिद्ध आहेत. लल्लेश्वरी म्हणतात, ''ज्याने आपला-परका, दिवस-रात्र या सर्वांना समान मानले, त्याच्या मनात भेदभाव मुळीच राहिला नाही, त्यालाच ईश्वराची प्राप्ती झाली, असे समजावे. ''सर्वव्यापी भगवान शिवांचा जटासंभार एखाद्या जाळ्याप्रमाणे विश्वाला आच्छादून टाकत आहे, सर्व प्राणिमात्रात भगवान शिवच भरले आहेत काश्मीरी भाषेत अभंगरचनेला 'वाख' असे म्हणतात. आपल्या एका वाख रचनेत लल्लेश्वरी म्हणतात, ''मी माझ्या गुरूंकडून एकच धडा शिकले आहे, तो म्हणजे बाहेरून आत पाहायला शिका.'' पूर्ण ऐक्याचा पुरस्कार करणाऱ्या संत लल्लेश्वरींच्या काळीही काश्मीरमध्ये हिंदू-मुसलमानांमधला संघर्ष तीव्र होता. मुसलमान राज्यकर्त्यांनी हजारो काश्मिरी हिंदूंना बाटविले आणि बाटलेले मुसलमानही हिंदूंवर अत्याचार करू लागले. लल्लेश्वरींनी आपल्या उपदेशात, हिंदू-मुस्लीम ऐक्यावर भर दिला. त्या म्हणतात, ''शिव सर्वत्र आहे, त्याने चराचर सृष्टी व्यापलेली आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये तो असल्याने भेदभाव करू नका, आधी स्वतःला जाणा, कारण स्वतःला जाणणे म्हणजे शिवाला जाणणे होय'' संत कबिराप्रमाणे लल्लेश्वरीही काश्मीरच्या हिंदू-मुसलमान दोन्ही समाजात आदरणीय ठरल्या. मुसलमानांमध्ये त्या 'लल्ला अरिफ' म्हणून तर हिंदूंमध्ये त्या 'योगिनी लल्लेश्वरी' म्हणून विख्यात झाल्या. त्यांच्या काव्यात शैवदर्शनातील अद्वैततत्त्वाप्रमाणे त्यांनी सुफी तत्त्वज्ञानातील प्रेमयोगही आहे. त्या अध्यात्माप्रमाणे जीवनातील प्रत्येक गोष्टींचा निवाडा आपल्या काव्यातून करतात. त्यामुळे आपल्या ज्ञानेश्वर-तुकारामादी संतांप्रमाणे लल्लेश्वरींचीही कित्येक वचने सुभाषितांसारखी काश्मिरी भाषेत आहेत. त्या म्हणतात,''जरी तुम्ही हुशार असलात तरी आपल्याला काही कळत नाही, अशा रीतीने वागा''''जरी तुम्ही पाहू शकत असलात तरी आपल्याला दसित नाही, असेच समजा''''जरी तुम्ही ऐकू शकत असलात तरी आपल्याला ऐकू येत नाही, असेच समजा'' ''जे जे तुम्हाला प्राप्त झालेय, ते ते धैर्याने सहन करा, प्रत्येकाशी नम्रतेने, प्रेमाने वागा. या सवयीने तुम्ही नक्कीच अंतिम सत्यापर्यंत पोचाल...''आपण जे पाहतो, ऐकतो, अनुभवतो त्यापलीकडे अंतिम सत्य आहे, हे उपनषिदातले तत्त्वच लल्लेश्वरी येथे सांगून जातात. जर प्रत्येक जीवात्म्याशी आपण आत्मीयतेने वागलो तरच त्या अंतिम तत्त्वाला आपण अनुभवू शकू, असा ज्ञान आणि कर्मयोगाचा समन्वय लल्लेश्वरी करतात. संत लल्लेश्वरींच्या काव्यात आपल्या आध्यात्मिक स्वानुभवाचे वर्णन बरेच आहे. त्या म्हणतात, ''तृषार्त भावनेने आकुल झालेल्या नजरेने मी शोधते आहे, रात्रंदिवस चहूकडे हेरते आहे. मी सत्याचा, मुक्तेचा साक्षात्कार स्वतःच्या ठिकाणी करून घेतला आणि माझे नेत्र सफल झाले'' एकदा संत लल्लेश्वरींना त्यांच्या एका शिष्याने विचारले ''देवीजी, आजकाल जिकडे पाहावे तिकडे संघर्षाचे वातावरण आहे, अशावेळी आपण काय करावे?''लल्लेश्वरी म्हणाल्या -- आधी स्वतःचा शोध घ्यावा, आपल्या हृदयात वास करणाऱ्या शिवाचे दर्शन घ्यावे. हा शिव सर्व भेदभाव दूर करील. त्यावर शिष्य म्हणाला, '' पण मनाची अस्वस्थता कमी होत नाही ना..'' लल्लेश्वरींनी त्यावर सांगितले -- ''प्रथम आपल्या प्राणावर ताबा मिळवावा, आपोआप मन स्थिर होईल. मग बघ आंतरिक ज्योत पेटते की नाही?''असे म्हणून लल्लेश्वरी गाऊ लागल्या स्वर्ग तूच रे पृथ्वी तूच दिवसरात्र वारा तूच तू परमात्मा जीव तूच पूजा तू अन्? फुले तूच जीवाशिवाचे ऐक्य सुंदर तुझ्यामुळे मन होते स्थिर

शिष्याला आपल्या गुरुमाऊली लल्लेश्वरींचे म्हणणे पटले. त्यानंतर त्याने केलेल्या साधनेमुळे त्याला आत्मसाक्षात्कार झाला. संत लल्लेश्वरींनी आपल्या अवतारसमाप्तीच्या समयी समाधी लावल्यावर त्यांच्या शरीरातून एक ज्योतिर्मय दिव्य शलाका निघून आकाशात विलीन झाली. लल्लेश्वरी अंतर्धान पावल्या. त्यांच्या तेजस्वी संतत्वाला नमन करू या.





# परमेश्वर हाच आपल्या जीवनाचा पाया

**परमेश्वर** हा विषय समजला नाही, तर हे जग सुखी होणे शक्य नाही, हा जीवनविद्येचा सिद्धांत आहे. इतिहासकाळापासून ते आजपर्यंत, पुरातन काळापासून ते आजतागायत हे जग सुखी झालेले नाही. जग सुखी व्हावे म्हणून लोकांनी अवतार घेतले. देवांचे अवतार झाले. रामावतार, कृष्णावतार असे अनेक अवतार झाले. हे कशासाठी घेतले? जगाला सुखी करण्यासाठीच हे अवतार घेतले. इतके अवतार होऊन सुद्धा काय झाले? जग जसे होते तसेच आहे. जग जिथे होते तिथेच आहे. किंबहुना पूर्वीच्या काळापेक्षा आज परिस्थिती कठीण आहे. त्यात काही फरक पडलेला नाही. अनेक प्रेषित झाले व या प्रेषितांनी निरनिराळे धर्म स्थापन केले व त्या धर्माच्या अनुयायांनी आपआपसांत तंटेबखेडे केले, दंगेधोपे केले, युद्धलढाया केल्या व या धर्मांच्या नावाखाली जितका रक्तपात झाला तो दुसऱ्या कुठल्याही कारणासाठी झाला नसेल. जग सुखी होण्याऐवजी दुःखीच झालेले आहे. किती साधू झाले व आहेत या साधूंचे काय? त्यांनी काय केले त्यांनी जगाचा विचार केला तरी जग आहे तिथेच आहे. मी नेहमी सांगत असतो की पुरातन काळापासून आजपर्यंत परमेश्वराचा जसा विचार व्हायला पाहिजे होता तसा झालेला नाही म्हणून ही परिस्थिती ओढवलेली आहे.



पण आज जेव्हा सत्य सांगायला जातो तेव्हा अनेकांना ते पटत नाही. धर्मामुळे, जातींमुळे, पंथांमुळे, संप्रदायांमुळे मने संकुचित झालेली आहे. बुद्धी संकुचित झालेली आहे. याचा परिणाम म्हणजे भांडणतंटे अधिक झाले. युद्ध लढाया अधिक झाले. जीवनविद्येने याचा पूर्ण विचार केला व यावर तोडगा काढला पाहिजे असे ठरविले. तोडगा काढला नाही, तर हे असेच चालत राहणार. आम्ही जे सांगतो ते लोकांना पटते असे नाही कारण अनेकांचा मेंदू हा चुकीच्या संकल्पनांमध्ये गुंतलेला आहे. द्वैतअद्वैत, विशेष द्वैत विशेष अद्वैत, शुद्ध द्वैत शुद्ध अद्वैत या अनेक गोष्टींमध्ये लोक गुंतलेले होते व अजूनही आहेत. हे मी का सांगतो आहे? कारण या विषयाचा विचार करायचा झाला तर तो नीट समजून घेतला पाहिजे. जीवनविद्या सांगते परमेश्वर ज्याला म्हणतात तो परमेश्वर व आपण समजतो तो परमेश्वर यामध्ये खूप अंतर आहे. लोक आज परमेश्वर म्हटले की मूर्तीकडे जातात. लोकांच्या डोळ्यांसमोर निरनिराळे देव येतात. जे मूर्ती मानत नाहीत त्यांच्या डोळ्यांसमोर काहीच येत नाही. ते काहीतरी कल्पना करतात की कुठेतरी काहीतरी आहे व त्याला ते काहीतरी नाव देतात म्हणजे शेवटी ते कल्पनाच करतात. परमेश्वराबद्दल खरे ज्ञान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत परिस्थिती चिघळतच जाणार म्हणून जीवनविद्येने यावर तोडगा काढला. जीवनविद्या काय सांगते? परमेश्वर हे आपल्या जीवनाचे मूळ आहे आणि परमेश्वर हाच आपल्या जीवनाचे फळही आहे. याकडे दुर्लक्ष केले तर कुटुंब, जग, विश्व, कधीच सुखी होणार नाही. अगदी कितीही अवतार झाले, किती प्रेषित झाले, कितीही पंथ झाले व कितीही संप्रदाय झाले तरी हे जग असेच चालणार. म्हणून परमेश्वर हाच आपल्या जीवनाचा पाया आहे आणि परमेश्वर हाच आपल्या जीवनाचा कळसही आहे.

# देववतारी सद्गुरू संत श्री बाळूमामा जन्मोत्सव

**देववतारी** सद्गुरू संत श्री बाळूमामा जन्मोत्सव किंवा जयंती दरवर्षी अश्विन म हिन्यात साजरी केली जाते. ही बाळूमामा महाराजांची जयंती आहे महाराष्ट्रातील आदमपूर येथे या दिवसाला विशेष महत्त्व आहे. बाळूमामा जन्मोत्सव २०२६ ची तारीख २३ ऑक्टोबर आहे. विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील मेंढपाळ समाजात बाळूमामांचे हजारो अनुयायी आहेत. बाळूमामांचा जन्म ३ ऑक्टोबर १८९२ मध्ये बेळगावनजीक चिक्कोडी तालुक्यातील 'अक्कोळ' या आडवळणी खेडेगावातील मायाप्पा–सत्यवा या पती–पत्नीच्या पोटी झाला. मायाप्पा–सत्यवा यांचे थोरला आणि धाकला लेक चारचौघांसारखे असले तरी मधला बाळू मात्र त्याच्या विचित्र वर्तनाने कलागुणी म्हणून प्रसिद्ध होता. बाळू ग्रामस्थांपासून फटकून असलेला, कुणाच्या आल्या–गेल्यात नसलेला, एकांतवास प्रिय मानणारा आणि सदोदित स्वतःमध्येच मग्न राहणारा होता. पण, बाळूचे असे वागणे आई वडिलांच्या जिव्हारी घोर लावण्यासारखे होते. बाळूनेलहानपणापासून अनेक चमत्कार दाखवल्याच्या कथा आहेत. बाळूला कामाचं वळण लागावं यासाठी मायाप्पांनी त्याला गावातील चंदूलाल शेटजी जैन यांच्याकडे नोकरीस ठेवले. शेटजींच्या घरच्या बकऱ्या जंगलात चरावयास नेण्याचे काम बाळूवर सोपवण्यात आले. चंदूलाल शेटजींच्या गोठ्यातील एका कोपऱ्यात बाळू निवांत पडून राहत असे. शेटजींनी दिलेल्या फुटक्या थाळीत जेवत असे आणि जेवून झाले की, थाळी घासून पुसून स्वच्छ करीत असे.एकदा सहजच गोठ्यामध्ये गेलेल्या शेठजींच्या म्हाताऱ्या आईला बाळूच्या थाळीतून तेजस्वी प्रकाश परावर्तित होत असल्याचे दिसून आले. कुतूहलाने ती थाळी उचलती झाली तेव्हा थाळीच्या मध्यभागी त्यांना बस्तीचे दर्शन घडले अशी कथा आहे. मायाप्पा आणि सत्यवा यांनी बाळूमामांचे लग्न लावून दिले. योग्य त्या वेळी बाळूमामांना श्री मुळे महाराजांचा अनुग्रह झाला. आणि त्याच वेळी बाळूमामांच्या अतर्क्य–अवधूतस्वरूपी वागण्याला सांप्रदायिक शिस्तीची झालर लाभली. बाळूमामांच्या सहज बोलण्यातून–वागण्यातून अनेक लीला घडत असत. त्यांच्या हातून कळत–नकळत घडलेल्या अनेक चमत्कारांमुळे अनेकांचे जीवन धन्य झाले. पण, जे काही चमत्कार घडत होते ते त्यांनी कोणत्याही यशाचे श्रेय स्वतःकडे घेतले नाही.



धोतर, पूर्ण बाह्यांचा शर्ट, डोक्यावर रुमाल, पायात चामडी चपला, हातात धनगरी काठी, सडपातळ उंचपुरी देहयष्टी, सावळा वर्ण असलेले बाळूमामा कानडी व मराठी भाषा अस्खलितपणे बोलत, तर खेडूत मंडळींशी खेडवळ भाषेत बोलत असत. माणसाने माणसासारखं वागावं ही त्यांची शिकवण होती.

बाळूमामांनी वयाच्या ७४ व्या वर्षी १९६६ मध्ये महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील आदमापूर नावाच्या गावात समाधी घेतली.

आदमापूर येथे सदगुरू संत बाळूमामा यांच्या समाधीमंदिराचे दक्षिणाभिमुख सुरेख कोरीव दगडी महाद्वार पाहून प्रत्येक प्रवासी थांबतो. हात–पाय धुतो, प्रशस्त सभामंडपात येतो. मंडपाचे रंगकाम, येथील दीपयोजना, टापटीप आणि बाळूमामा मार्मिकपणे परिचय करून देणाऱ्या ठसठशीत ओव्या पहात रमतो. एवढ्यात त्याची नजर समोरील गाभाऱ्यात जाते.पूर्ण आकाराची बाळूमामांची प्रसन्न मूर्ती पाहून प्रत्यक्ष पाहिल्याचा आनंद अनुभवतो. नकळत हात जोडले जातात. बाळूमामांच्या उजव्या हाताला मामांचे सदगुरू परमहंस मुळे महाराज, गारगोटी यांची मुर्ती आहे. मामांच्या डावीकडे श्री विठ्ठल–रखुमाईच्या सुंदर मूर्ती असून शेजारी श्री हालसिद्धनाथांची प्रतिमा आहे. गाभाऱ्यात मामांच्या देहावर बांधलेली समाधी आहे. त्यावर पादुका आहेत. जवळ खडावाही पुजलेल्या आहेत. समाधीच्या दोन्ही बाजूस फणा काढलेल्या नागांच्या प्रतिकृती आहेत. गाभाऱ्यात दक्षिण बाजूस मामांच्या निद्रेचा पलंग आहे. बाळूमामाच्या मेंढ्या पवित्र मानल्या जातात, सध्याच्या मेंढ्या ज्या बाळूमामाच्या मूळ मेंढ्यांच्या वंशज (वंशज) आहेत त्या शुभ मानल्या जातात. बाळूमामाच्या भक्तांच्या विनंतीवरून या मेंढ्यांचे गट विविध ठिकाणी नेले जातात.

# चला कोजागिरी साजरी करुया...!

**नवरात्र** संपले की वेध लागतात कोजागिरीचे. नवरात्रीचे समापनच कोजागिरीने होते असे म्हटले तर वावगं होणार नाही. शरद ऋतूतील आश्विन महिना. आश्विन महिन्यातील आश्विन पौर्णिमा म्हणजेच ''कोजागरी पौर्णिमा'' किंवा ''शरद पौर्णिमा''. या पौर्णिमेला अजूनही बरीच नावे आहेत.

कोजागिरी पोर्णिमा ! कोऽजार्गति? कोऽजार्गति? म्हणजे कोण जागे आहे ?, कोण जागृत आहे? असे विचारत देवी सर्वत्र फिरते असे म्हणतात. नवरात्राचे नऊ दिवस शक्ति व बुध्दिच्या दैवताचे आराधान करून दसऱ्याला म्हणजेच विजया दशमीला विजय संपादनासाठी सीमोल्लंघन करतात व त्यानंतर येणारी ही पोर्णिमा अर्थात अश्विन पौर्णिमा म्हणजेच कोजागिरी ! कोजागरी पौर्णिमेच्या रात्री



चंद्र आपल्या संपूर्ण १६ कलांमध्ये असतो. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो आणि त्यामुळे तो मोठा दिसतो. चंद्राच्या या गुणांमुळेच 'नक्षत्राणामहं शशी' म्हणजे 'नक्षत्रांमध्ये मी चंद्र आहे',असे भगवान श्रीकृष्णाने श्रीमद्भगवद्गीतेत सांगितले आहे. कृषी संस्कृतीमध्ये या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. शेतकरी वर्गामध्ये हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. निसर्गाबद्दल वाटणाऱ्या कृतज्ञतेपोटी कोकणात नवान्न पौर्णिमा साजरी करण्याची प्रथा आहे. या दिवशी घराघरात नवीन धान्य आलेले असते. भात, नाचणी, वरी आदी प्रकारच्या धान्याची एकप्रकारे पूजा करण्याचा दिवस म्हणजे नवान्न पौर्णिमा. काही मान्यता नुसार अश्विन पौर्णिमेला महालक्ष्मी देवीचा जन्म झाला आणि समुद्र मंथनाच्या दिवशी लक्ष्मी देवी भूतलावर प्रकट झाली, असे सांगितले जाते.

या दिवशी प्रत्येक कुटुंबातील ज्येष्ठ अपत्याला ओवाळून त्याची किंवा तिची आश्विनी साजरी करतात. या दिवशी चंद्र पृथ्वीच्या सर्वात जवळ असतो. या दिवशी दम्यावरचे आयुर्वेदिक औषध घेण्याची पद्धत आहे. या दिवशी घेतलेले औषध लवकर लागू पडते असा प्रघात आहे. ह्या दिवशी पाळावयाच्या व्रताला 'कोजागरव्रत' म्हणतात. दिवसा उपवास करून रात्री लक्ष्मी व ऐरावतारूढ इंद्र यांची पूजा करावी, या पूजेनंतर रात्री चंद्राला आटीव दूधाचा नैवेद्य दाखवावा. दूध आटवून त्यात केशर, पिस्ते, बदाम, चारोळ्या, वेलदोडे, जायफळ वगैरे गोष्टी घालून, तसेच साखर घालून, नैवेद्य दाखविला जातो. देव व पितर यांना नारळाचे पाणी व पोहे समर्पण करावेत तसेच ते आप्तेष्टांसह स्वतःही सेवन करावेत.

रात्री उशिरापर्यंत गप्पा–गोष्टी करत, रास व गरबा खेळत, आठवणीतील गाणी गात सर्वजण जागरण करतात. दूध आटवून बदाम, केशर, पिस्ता वगैरे सुकामेवा घालून लक्ष्मी देवीला व चंद्राला नैवेद्य दाखविला जातो आणि ते मसाला दूध मग प्राशन केले जाते. चंद्र आपल्या सौम्य प्रकाशात सबंध पृथ्वीला न्हाऊ घालत



असतो. कौजागरी पौर्णिमेच्या अनेक कथा आहेत, त्यापैकी एक अशी सांगितली जाते की, एकदा एक राजा आपले सगळे वैभव्य आणि संपत्ती गमावून बसतो. त्याची राणी महालक्ष्मीचे व्रत करते आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होऊन तिला आशीर्वाद देते आणि त्या राजाचे वैभव त्याला परत मिळते. असं म्हणतात की महालक्ष्मी मध्यरात्री या चंद्रमंडलातून उतरून खाली पृथ्वीवर येते. ती चांदण्यांच्या प्रकाशात ''अमृतकलश' घेऊन प्रत्येकालाच विचारते, की ''को जागर्ति...? को... जागर्ति...?' म्हणजे आपल्या कर्तव्याला कोण जागृत आहे का? कुणी जागं आहे का? अन्? तिच्या हाकेला साद देण्यासाठी सगळेच जागे राहतात. मग तिची वाट पाहणाऱ्या, साद देणाऱ्या सगळ्यांना ती ''अमृत' म्हणजे लक्ष्मीचं वरदान देते, धनधान्य, सुखसमृद्धी देते. या दिवशी द्यूत खेळावे, असेही सांगितले आहे.

(पान ३ वर)

# आळे गावातील रेड्याची समाधी का आहे प्रसिद्ध?

**महाराष्ट्राची** भूमी संतांच्या पवित्र चरणांनी आणि त्यांच्या अलौकिक कार्याने समृद्ध झाली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज, संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज, संत गोरा कुंभार अशा अनेक संतांनी भक्ती, ज्ञान, समता आणि मानवतेचा संदेश समाजाला दिला.

या संतपरंपरेत संत ज्ञानेश्वर महाराजांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी आपल्या अलौकिक प्रतिभेने आणि आध्यात्मिक अनुभूतीने सामान्य माणसासाठी ज्ञानाची कवाडे खुली केली. त्यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आजही भक्तांच्या मनात श्रद्धा निर्माण करतात. त्यांपैकी रेड्याच्या मुखातून वेद वदवून घेतल्याची आख्यायिका विशेष प्रसिद्ध आहे.



या आख्यायिकेशी संबंधित रेड्याची समाधी पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात असलेल्या आळे गावात असल्याची श्रद्धा आहे. आळे येथील हे समाधी मंदिर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या स्मृतीशी जोडले गेले असून, वारकरी संप्रदायातील भाविकांसाठी ते श्रद्धेचे स्थान मानले जाते.

संत ज्ञानेश्वर महाराज हे तेराव्या शतकातील महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील महान संत, तत्त्वज्ञ आणि कवी होते. त्यांचे वडील विठ्ठलपंत आणि आई रुक्मिणीबाई. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव आणि मुक्ताबाई या चार भावंडांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही अध्यात्माचा मार्ग स्वीकारला. त्या काळात समाजामध्ये कर्मकांड, जातिभेद आणि धार्मिक ज्ञानावरील काही विशिष्ट वर्गांची मक्तेदारी मोठ्या प्रमाणावर होती. अशा परिस्थितीत संत ज्ञानेश्वर महाराजांनी भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान मराठी भाषेतून सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले. त्यांनी रचलेल्या ज्ञानेश्वरी या ग्रंथाने मराठी साहित्याला आणि अध्यात्माला नवे वैभव प्राप्त करून दिले. ज्ञानेश्वर महाराजांच्या विचारांचा केंद्रबिंदू सर्व जीवांमध्ये परमेश्वराचे अस्तित्व पाहणे हा होता. त्यांच्या दृष्टीने भक्ती ही केवळ कर्मकांडापुरती मर्यादित नव्हती, तर ती सर्व प्राणिमात्रांविषयी प्रेम, करुणा आणि समभाव बाळगण्याची जीवनदृष्टी होती.

पैठणमधील शास्त्री–पंडितांनी या चार भावंडांना प्रचंड त्रास दिला आणि मुंज करण्यास व वेदपठणाचा अधिकार देण्यास स्पष्ट नकार दिला. पंडितांनी ज्ञानेश्वरांचा उपहास करण्यासाठी आणि त्यांची परीक्षा घेण्यासाठी विचारले, ''या जगात वेद केवळ ब्राह्मणांचे आहेत, मग तू जर ज्ञानी आहेस, तर या समोर उभ्या असलेल्या मुक्या रेड्याच्या तोंडातून वेद म्हणून दाखव.''

ज्ञानेश्वर माऊलींनी कोणतीहीर न मानता, अत्यंत शांतपणे त्या रेड्याच्या मस्तकावर आपला हात ठेवला. क्षणातच त्या मुक्या रेड्याच्या मुखातून ऋग्वेदाच्या ऋचा स्पष्टपणे बाहेर पडू लागल्या:'ॐ अग्निमीळे पुरोहितं यज्ञस्य देवमृत्विजम्? । होतारं रत्नधातमम्? ॥' (ऋग्वेदातील पहिली ऋचा)या कथेमागील आध्यात्मिक आशय असा की, परमेश्वराचे अस्तित्व कोणत्याही एका व्यक्तीपुरते किंवा समाजघटकापुरते मर्यादित नाही. प्रत्येक जीवामध्ये चैतन्य आहे आणि त्या चैतन्याचा आदर करणे हेच खऱ्या अध्यात्माचे लक्षण आहे.पुणे ते आळेफाटा हे अंतर साधारणपणे ९० ते १०० किमी आहे. पुणे (शिवाजीनगर/संगमवाडी) वरुन नाशिक किंवा जुन्नरकडे जाणाऱ्या एसटी बसने अथवा ट्रॅव्हल्सने तुम्ही आळेफाट्याला उतरू शकता. तेथून रिक्षाने आळे गावातील मंदिरापर्यंत जाता येते. मुंबई/ठाणे/कल्याणकडून येताना माळशेज घाटा मार्ग (कल्याण–अहमदनगर हायवे) ने आळेफाट्याला येऊ शकता. कल्याण, ठाणे येथून आळेफाटा किंवा अहमदनगरकडे जाणाऱ्या बसेस उपलब्ध असतात.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील आळे गावातील रेड्याची समाधी हे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या जीवनाशी संबंधित श्रद्धास्थान म्हणून ओळखले जाते. रेड्याच्या मुखातून वेद वदवून घेतल्याची प्रसिद्ध आख्यायिका या स्थळाला विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व प्राप्त करून देते. आळे येथील रेड्याची समाधी ही केवळ एका प्रसिद्ध आख्यायिकेशी जोडलेली जागा म्हणून न पाहता, संतविचारांची आठवण करून देणारे श्रद्धास्थान म्हणून पाहता येते. संत ज्ञानेश्वर महाराजांचा संदेश हाच की, ज्ञानाने अहंकार नष्ट व्हावा, भक्तीने मन निर्मळ व्हावे आणि प्रत्येक जीवाकडे आदराने पाहण्याची दृष्टी निर्माण व्हावी.

# कहत कबीर सुनो भाई साधो...

**अत्यंत** शुभ असा ब्रह्ममुहूर्ताचा समय होता. रात्रीच्या काळोखालाच जणू स्वतःला उजळून घेण्यासाठी पहाटेची आंस लागली होती. नक्षत्रांच्या अस्फुट तेजात गंगेचे पाणी चमकत होते. गंगेच्या घाटाच्या पायरीवर वसलेले कबीर याचवेळी आपल्या सद्गुरूंची वाट पाहात होते. गंगास्नानासाठी तेथे नित्य येणारे स्वामी रामानंद आजही तेथे येऊन घाटाच्या पायऱ्या उतरू लागले. अजून पुरते उजाडले नसल्याने अंधारात त्यांचा पाय गुरूदीक्षेसाठी आतुरलेल्या शिष्याला लागला. स्वामींच्या तोंडून 'राम राम' शब्द बाहेर पडले. ते शिष्याच्या अंतःकरणात तत्क्षणीच कोरले गेले.'राम' ही फक्त दोन अक्षरे, पण संत कबिरांना त्यात साऱ्या अध्यात्माचे रहस्य गवसले. नानाविध भेदांनी भरलेले हे जग एका आत्मारामात सामावले असल्याची त्यांना प्रतीती आली. भेद नही अभेद हुवा मन राम भयो जग सारा।। कहत कबीर सुनो भाई साधो जगमो रहकर न्यारा।। संत कबिरांच्या व्यक्तिमत्त्वात विविध पैलूंचे अद्भुत रसायन होते. ते जसे भक्त होते तसेच तत्त्वज्ञ, योगी, सिद्ध साधकही होते. अज्ञान, अंधश्रद्धेने पछाडलेल्या जनसामान्यांच्या उद्धाराचा त्यांना विलक्षण कळवळा होता. ते स्वतः कुठल्याही एका धर्मसंप्रदायाच्या चौकटीत अडकले नाहीत. सर्व धर्मांच्या, संप्रदायांच्या उत्तमोत्तम तत्त्वांचा त्यांनी उत्कृष्ट समन्वय केला. अद्वैत वेदान्ताचा पुरस्कार मात्र त्यांनी प्राधान्याने केलेला दिसतो. त्यांची भक्ती पराविद्येने संपन्न, डोळस होती. घुंगट का पट खोल तुझे राम मिलेगा। घट घट बिच मे रामरमैया झुटा पचरंग खोल।। शून्य मेहेलमे दीप बिराजे बाजे अनुहत ढोल।। कहत कबीर सुनो भाई साधो रामनाम भर तोल कबीर म्हणतात,



''देह म्हणजेच मी, या भावनेचा घुंगट दूर करून पाहा. तुला स्वतःमध्ये तसेच या चराचरामध्ये भरलेला राम मिळेल. अहंकारशून्य अंतःकरणातच ज्ञानदीप तेवतो, अनाहत नादाचा ढोल वाजतो. तू रामनाम तोलून भरभरून आत्मसुख घे.''कबिरांनी व्यापक नैतिक नियमांच्या पालनाचा सदैव आग्रह धरला,छोटीसी जिंदगानी उपर क्या मगरुरी करना।।क्या ले आया क्या ले जायेगा कायकु गाफल करना।।असे क्षणभंगुर जीवनाचे चित्र रंगवून अंतिम सत्याचा शोध घेण्यास ते प्रवृत्त करतात. आजची जीवनशैली कितीही बदललेली असली तरी इ. स.च्या पंधराव्या शतकातला हा संत आजही आपणास चुकलेल्या वाटेवरून योग्य मार्गाकडे येण्यासाठी उत्तम मार्गदर्शन करू शकतो. ज्येष्ठ पौर्णिमा हा कबिरांचा जन्म दिवस. पतीच्या अपमृत्यूला टाळणाऱ्या सावित्रीचे पूजन जसे या दिवशी करावयाचे तसेच या दिवशी आपणास नैतिक अधःपतनापासून वाचवून सर्वात्मकतेकडे नेणाऱ्या संत कबिरांचेही स्मरण करून त्यांना मनोभावे वंदन करावयाचे. 'बीजक' हा संत कबीर यांच्या मूळ शिकवणींचा आणि रचनांचा सर्वात मुख्य, अधिकृत आणि पवित्र ग्रंथ मानला जातो. कबीरपंथीय अनुयायांसाठी हा ग्रंथ अत्यंत आदरणीय आहे.'बीजक' या शब्दाचा अर्थ 'गुप्त धन किंवा रहस्य सांगणारे शब्द' असा होतो. ज्याप्रमाणे जमिनीत पुरलेले गुप्त धन शोधण्यासाठी एका सांकेतिक शब्दाची गरज असते, त्याचप्रमाणे मानवी मनातील अज्ञानाचा अंधार दूर करून आत्मज्ञानाचे गुप्त धन मिळवून देणारा हा ग्रंथ आहे, अशी मान्यता आहे. संत कबिरांनी स्वतः या ग्रंथाचे लेखन केले नाही, ते म्हणतात ''मसि कागद छूयो नहीं, कलम गह्यो नहिं हाथ'' पण स्वतः रचलेली पदे मात्र त्यांच्या मुखातून निघत असत. त्या पदांचे आणि दोह्याचे अनन्यसाधारण महत्त्व जाणून कबिरांचे मुख्य शिष्य भागोदास आणि धर्मदास यांनी ते संकलित करून ग्रंथबद्ध केले.

(पान ३ वर)